POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१५१ ● मुंबई, शुक्रवार, ०२ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

### १ जानेवारी, देशभरात पावसाचा दिवस...

जम्मू काश्मीर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंडच्या पर्वतीय भागांमध्ये कुठं हाडं सुन्न करणारा पाऊस तर कुठं बर्फवृष्टीचा अंदाज आहे. थंडीची ही लाट तीव्र होत जाणार असल्यानं नागरिकांना सतर्कता बाळगण्याचं आवाहन करण्यात आलं आहे. तर, हिवाळ्यात धुक्यासह पावसाची हजेरी आणि गारठा जाणवणार असून, तामिळनाडू, लक्षद्वीप, कर्नाटकात वादळी पावसाचा इशारा आहे. दक्षिण भारतासह देशात पुढच्या ४८ तासात अनेक हवामान बदल पाहायला मिळणार असून यंत्रणा या बदलांवर लक्ष ठेवून वेळोवेळी त्याबाबतची माहिती देत राहतील असं स्पष्ट करण्यात आलं आहे.

### मुंबईकरांची नवीन वर्षाची सुरुवात पावसाने

मुंबईत १ जानेवारी २०२६ या नवीन वर्षाची सुरुवात अनपेक्षित झाली. नववर्षाच्या पहिल्याच दिवशी पावसाने हजेरी लावली. ताडदेव, गोरेगाव, सीएसएमटी, मुंबई सेंट्रलसह दक्षिण मुंबईतील अनेक भागात पावसाच्या सरी कोसळल्या. सकाळी कामावर निघण्याच्या वेळी अचानक आलेल्या या पावसाने नोकरदारांची, नागरिकांची मोठी तारांबळ उडाली.

# हिमालयापासून मुंबईपर्यंत पाऊसच पाऊस

## कडाक्याच्या थंडीची त्सुनामी अन् धुक्याचा कहर... हवामानात धास्तावणारे बदल

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

नव्या वर्षाची सुरुवात अतिशय उत्साहात झालेली असली तरीही याच नव्या वर्षापासून हवामानानंही अगदी पहिल्याच दिवसापासून तालरंग दाखवण्यास सुरुवात केली आहे. एकिकडे थंडीचा कडाका वाढत आहे, तर दुसरीकडे उन्हाचा तडाखा आणि कुठं चक्क जोरदार पाऊस बरसत असल्याचं चित्र आहे. ज्यामुळं देशात नेमका कोणता ऋतू सुरू आहे हाच प्रश्न अनेकांना पडल आहे. हवामान विभागाच्या माहितीनुसार मागील ४८ तासांपासून सक्रिय असणाऱ्या पश्चिमी झंझावातामुळं उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, लेह लडाख, जम्मू काश्मीरसह काही मैदानी भागांमध्ये पावसाची हजेरी पाहायला मिळाली असून, पुढील २४ तासांमध्येही पाऊस बरसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. इतकंच नव्हे, तर थंडीची लाटसुद्धा हाडं गोठवणार असल्यानं हे हवामानबदल चिंतेत भर टाकत आहे.

### महाराष्ट्रात पावसासह गारठा...

महाराष्ट्रात किनारपट्टी भागांमध्ये पावसाची हजेरी राहणार असून, २४ तासांमध्ये बहुतांशी वातावरण ढगाळ असेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे. तर, पश्चिम महाराष्ट्रातील घाट क्षेत्र, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका वाढण्याचा इशारा आहे. उत्तर भारतात पाऊस आणि थंडीची लाट आणखी तीव्र होणार असल्यानं महाराष्ट्रात गारठा कायम असेल असा इशारा जारी करण्यात आला आहे. पुढील २४ तासांनंतर मात्र राज्याच्या काही भागांमध्ये तापमानाच चढ-उतार अपेक्षित असल्याचा अंदाज आहे. दरम्यान, मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये पुढील १२ तास पावसाचा इशारा असून, त्यानंतर शहरात शीतलहरींचा वावर जाणवेल. तर, वातावरण काहीसं ढगाळ असेल असा प्राथमिक अंदाज आहे.



दिल्ली आणि पश्चिमी उत्तरप्रदेशातील काही भागांमध्ये ढगाळ वातारणाचा अंदाज असून, पावसाच्या हलक्या सरींचा अंदाज राजस्थान, मध्य भारत आणि महाराष्ट्राच्याही किनारपट्टी भागांमध्ये वर्तवण्यात आला आहे. तर, स्कायमेट या खासगी हवामान संस्थेनं पुढील ५० तासांचा अंदाज वर्तवत दक्षिण भारतामध्ये हवामानबदल होणार असून, तामिळनाडूसह बहुतांश भागांमध्ये वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पूर्वोत्तर भारतही या पावसास अपवाद ठरणार नाही. देशाच्या चारही दिशांना असणाऱ्या या हवामान बदलांचे परिणाम महाराष्ट्रात होत असून, एकाच वेळी पाऊस, थंडी आणि ऊन अशी काहीशी स्थिती पाहायला मिळत आहे.




# राज्यातील या महापालिकेची निवडणूक रद्द होणार?

## गंभीर आरोपानंतर मोठी मागणी... प्रकरण कोर्टात...



### सोलापूर महानगर पालिकेची निवडणूक रद्द करण्याची मागणी

सोलापूर महानगरपालिकेची निवडणूक थांबवण्याची मागणी करण्यात आली आहे. शिवसेना, शिवसेना ठाकरे गट, काँग्रेस आणि महाविकास आघाडीतील इतर पक्षांनी ही मागणी केली आहे. या पक्षांनी आता निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असून हायकोर्टात जाण्याची तयारी केली आहेय. असीम ससोदे यांच्या माध्यमातून याचिका दाखल करणार असल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी दिली आह्वी मागणी.

■ सोलापूर। प्रतिनिधी,

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत संपली आहे. सध्या अर्जांची छाननी सुरू आहे. २ जानेवारीपर्यंत उमेदवारांनी माघार घेता येणार आहे. ३ जानेवारीला उमेदवारांची अंतिम यादी जाहीर होणार असून उमेदवारांनी चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यामुळे आता राजकीय पक्षांनी प्रचाराच्या तयारीला सुरुवात केली आहे. अशातच आता राज्यातील एका महानगर पालिकेची निवडणूक रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठी विविध राजकीय पक्षांनी न्यायालयात जाण्याची तयारी केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**निवडणूक अधिकारी काय म्हणाले?**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत भाजपने उशिरा एबी फॉर्म दाखल केल्याचा आरोप शिवसेना शिंदे गट आणि महाविकास आघाडीने केला आहे. त्यामुळे निवडणूक रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एबी फॉर्मचे आरोप फेटाळले आहेत. उउळश दृश्यांनूसार दुपारी ३ नंतर खिडकीतून कागदपत्रांची एक फाईल आली आहे, मात्र त्यामध्ये एबी फॉर्म होते असं सिद्ध करता येऊ शकत नाही असे स्पष्टीकरण निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिले आहे.

मात्र आता या निर्णयाविरोधात दाद मागण्यासाठी शिंदे गट आणि महाविकास आघाडीचे नेते उच्च न्यायालयात जाणार आहेत. ज्येष्ठ वकील असीम सरोदे यांच्या माध्यमातून उच्च न्यायालयात दाद मागणार आहेत. या संदभार्तील पत्र मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांना शिंदे गट आणि महाविकास आघाडीने दिले आहे.

**ज्येष्ठ वकील असीम सरोदे काय म्हणाले?**

या प्रकरणावर बोलताना ज्येष्ठ वकील असीम सरोदे यांनी म्हटले की, ह्यभाजपाच्या उमेदवारांना दुपारी तीन नंतर खिडकीतून कागदपत्रे पुरवण्यात आली. हा संपूर्ण प्रकार बेकायदेशीर असून निवडणूक निर्णय अधिकारी देखील भाजच्याच बाजूने निर्णय देत आहेत. ते स्वतः मान्य करतात की ३ नंतर खिडकीतून कागदपत्रे आली आहेत. मात्र ते एबी फॉर्म असल्याचे सिद्ध होत नाही म्हणत त्यांनी अर्ज वैध ठरवले आहेत. हे संपूर्णपणे बेकायदेशीर आहे, अशा पद्धतीने दुपारी तीन वाजता मुदत संपल्यावर कागदपत्रे देता येऊ शकतं नाही. त्यामुळे आम्ही निवडणूक निर्णय अधिकारी, मनपा आयुक्त आणि राज्य निवडणूक आयुक्त यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे.'

# मुंबई-भाईंदर, पूर्व-पश्चिम थेट जोडणार

## घोडबंदर रोडवरही धावणार, २०२६मध्ये तीन मेट्रो सेवेत

■ मुंबई। प्रतिनिधी,

नवीन वर्षात आजपासून प्रवेश करत असतानाच मुंबईकरांसाठी सुवार्ता आहे. या वर्षात मुंबईकरांच्या सेवेत तीन मेट्रो मार्गिका दाखल होणार आहेत. त्यातील एक मार्गिका उत्तर मुंबईला भाईंदरशी जोडेल, अन्य मार्गिका ठाण्यात घोडबंदर रस्त्याच्या डोक्यावरून धावेल तर तिसरी मार्गिका पूर्व मुंबईतील आहे. मुंबईत एकूण १७ मेट्रो मार्गिकांचे ३५० किमीचे जाळे उभारले जाणार आहे. त्यातील जवळपास ७० किमीच्या चार मेट्रो मार्गिका प्रवासीसेवेत आहेत. आता नवीन वर्षात तीन मेट्रो मार्गिका पहिल्या टप्प्यात जवळपास २२ किमीसाठी सुरू होत आहेत.



### कसा असेल मेट्रो २ ब चा मार्ग?

पश्चिम मुंबईला पूर्व किनारपट्टीशी जोडणारी ही मार्गिका ईएसआयसीनगर ते मंडाळा, अशी आहे. या मार्गिकेचा पहिला टप्पा मंडळा ते चेंबूर असा पाच स्थानकांचा असेल. हा टप्पा तयार आहे. मात्र, पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटनासाठी तो प्रवासीसेवेत दाखल झालेला नाही. ही मार्गिका २०२६ च्या प्रारंभी सुरु होणार आहे.

**स्थानके :** मंडाळा, मानखुर्द, बीएसएनएल (गोवंडी), शिवाजी चौक (चेंबूर) व डायमंड गार्डन (चेंबूर)

### मेट्रो ९ ची स्थिती काय?

ही उन्नत मेट्रो दहिसर ते नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान (भाईंदर), अशी आहे. या मार्गिकेच्या चार स्थानकांच्या पहिल्या टप्प्याची तयारी पूर्ण झाली आहे. पंतप्रधानांच्या हस्ते या मार्गिकेचे उद्घाटन होणार आहे. आचारसंहिता संपल्यानंतर २०२६ च्या सुरुवातीला कार्यान्वित होणार आहे.

**स्थानके :** दहिसर पूर्व, पांडुरंगवाडी, मिरागाव व काशीगाव

### मेट्रो ४ अ कधी सुरू होणार?

गायमुख-कासारवडवली- घाटकोपर-वडाळा ही मेट्रो ४ अ मेट्रो ४ ठाणे मेट्रो म्हणून प्रसिद्ध आहे. डिसेंबरमध्ये ही मेट्रो सेवेत येणे अपेक्षित होते. हा स्थानकांऐवजी पाच स्थानकांदरम्यानच साधी चाचणी घेऊन ही मार्गिका सज्ज असल्याचा आभास प्रशासनाने निर्माण केला. नियोजनानुसार पहिल्या टप्प्यात गायमुख-कासारवडवली-कॅडबरी जंक्शन अशी पूर्ण दहा स्थानकांदरम्यान ही मेट्रो सुरू होईल, अशी चिन्हे आहेत. त्यासाठी २०२६ ची किमान अर्धे वर्ष प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# १५० किलो स्फोटके भरलेली गाडी राजस्थानमध्ये पकडली

### हेतूबाबत तपास

भंवरलाल (वय ४८), दुलीलाल (वय ३३) अशी अटक केलेल्या दोन आरोपींची नावे आहेत. हे दोघेही करवर बूंदीचे रहिवासी आहेत. कारमध्ये सापडलेल्या स्फोटकांचा वापर कुठे होणार होता, याबाबत त्यांच्याकडे चौकशी केली जात आहे. ही स्फोटके ते कोणाकडे देणार होते, याचीही चौकशीही सुरू आहे. ही स्फोटके आणण्याचा हेतू काय होता, याचा तपासही पोलिसांकडून करण्यात येत आहे.

■जयपूर। प्रतिनिधी,

सरत्या वषार्ला निरोप आणि नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर हायअलर्टवर असलेल्या पोलिसांनी नाकाबंदीदरम्यान स्फोटकांनी भरलेली गाडी राजस्थानच्या टोंक येथे ताब्यात घेतली. कारमध्ये १५० किलो स्फोटके होती. त्यात अमोनियम नायट्रेट होते. ही स्फोटके वाहून नेण्यामागचा कट काय होता, ती स्फोटके कुठे नेण्यात येत होती, याचा तपास सुरू आहे. याबाबत पोलिसांनी सांगितले की, एक गाडी बुंदी येथून निघाली होती आणि ती टोंक येथे जात होती. याबाबत गुप्त माहिती मिळाली होती, त्या आधारे बरौनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाकाबंदी करून ही कार रोखण्यात आली. झडती घेतली असता गाडीमध्ये स्फोटकाचा मोठा साठा आढळला.



गाडीमध्ये १५० किलो अमोनियम नायट्रेट होते आणि ते युरियाच्या गोण्यांमध्ये दडवून ठेवले होते. त्याचबरोबर २०० डेंजर एक्स्प्लोझिव्ह कार्टेज आणि सेफ्टी फ्यूज वायरचे साधारण ११०० मीटर सहा बंडलही होते. पोलिसांनी कारमधून स्फोटके घेऊन जाणाऱ्या दोन आरोपींना अटक केली आहे.



# मंत्रिमंडळ बैठकीला मंत्री, अधिकारीच गैरहजर

■मुंबई। प्रतिनिधी,

ऐन महापालिका निवडणुकीच्या धावपळीत आणि वर्ष अखेरच्या दिवशी, बुधवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. पण, या बैठकीला खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अनेक कॅबिनेट मंत्र्यांनी दांडी मारली. शिवाय अनेक अधिकारी वर्षअखेरचा मुहूर्त साधून पर्यटनासाठी गेल्यामुळे बहुतांश अधिकाऱ्यांनीही दांडी मारली होती. सर्व दांडीबाहद्दर अधिकारी सुट्टीवर दिसतात, असे म्हणत कमी उपस्थितीवर मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली.

राज्यात महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. मंगळवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असल्यामुळे अनेक राजकीय नेत्यांची धावपळ उडाली होती. कॅबिनेट मंत्र्यांसह, राज्यमंत्री आणि अन्य लोकप्रतिनिधींना पक्षाचे एबी फॉर्म दिलेल्यांना अर्ज भरण्यासाठी वेळेत कार्यालयात पाठविण्यासाठी, उमेदवारी नाकारलेल्यांची समजूत काढण्यासाठी प्रचंड धावपळ करावी लागली. नाराजांच्या रोषाला सामोर जाण्याचे प्रकार तर अनेक ठिकाणी घडले.

बुधवारी झालेल्या बैठकीकडे महापालिकांच्या धापवळीत असलेल्या कॅबिनेट बैठकीकडे पाठ फिरवली. खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही बैठकीला नव्हते.

### राजकीय नेते, कार्यकर्ते, लोकप्रतिनिधींची मंत्रालयाकडे पाठ

मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात राज्यभरातील राजकीय नेते, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधींची गर्दी असते. पण, महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीमुळे राजकीय नेते, कार्यकर्ते आणि लोकप्रतिनिधी व्यस्त असल्यामुळे त्यांनीही मुंबईकडे पाठ फिरवली. बैठकीनंतर गाठीभेठी घेण्यासाठी चढाओढ असते. पण, बुधवारी मंत्रालयात शुकशुकाट होता.

# एचआयव्ही कर्मचाऱ्याला नोकरीत कायम करा! उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण आदेश

■मुंबई। प्रतिनिधी,

केवळ एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याच्या कारणावरून कायमस्वरूपी नोकरी नाकारणे, हे घटनात्मक हक्कांचे उल्लंघन ठरते, असा महत्त्वपूर्ण निवाळा देत उच्च न्यायालयाने सफाई कर्मचाऱ्याला नोकरीत कायम करण्याचा निर्णय दिला आहे.

रुग्णालयातील सफाई कामगाराला एचआयव्ही पॉझिटिव्ह असल्याच्या कारणावरुन नोकरीत कायमस्वरूपी दर्जा नाकारण्यात आला. व्यवस्थापनाचा संबंधित निर्णय मनमानी, भेदभावकारक आणि घटनात्मक हक्कांचे उल्लंघन करणारा आहे.

कामगाराच्या वैद्यकीय स्थितीचा त्याच्या कामावर कधीही परिणाम झालेला नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला आहे. रुग्णालयाने १९९४ पासून सफाई कामगार म्हणून काम करणाऱ्या ५५ वर्षीय व्यक्तीला कायमस्वरूपी दर्जा चुकीच्या पद्धतीने नाकारला होता. रुग्णालयाच्या धोरणाविरोधात सफाई कामगाराने उच्च न्यायालयात दाद मागितली होती. त्यावर सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने याचिकाकर्त्या कामगाराला मोठा दिलासा दिला.

**घटनेची पार्श्वभूमी :** डिसेंबर २००६ मध्ये रुग्णालय आणि मान्यताप्राप्त युनियनने वैद्यकीय तंदुरुस्तीच्या अधीन राहून अनेक तात्पुरत्या कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करण्यासाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली होती. त्यावेळी याचिकाकर्त्या कामगाराला केवळ वैद्यकीय तपासणीदरम्यान एचआयव्ही-पॉझिटिव्ह आढळल्याने वैद्यकीयदृष्ट्या अनफिट घोषित करण्यात आले आणि नोकरीत कायमस्वरुपी करण्यास नकार देण्यात आला होता.



## महाराष्ट्रातून जायचे तामिळनाडूत कांड करायचे...

# कंबोडियाशीही कनेक्शन, असं काय करायची ती टोळी

■चंद्रपूर। प्रतिनिधी,

चंद्रपूर पोलिसांनी देशातील सर्वात धक्कादायक रॅकेट उघडकीस आणले आहे. काही दिवसांपूर्वी चंद्रपूर जिल्ह्यातील एका शेतकऱ्याने सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी किडनी विकल्याचे प्रकरण समोर आले होते. त्यानंतर आता पोलिसांनी देशातील सर्वात मोठे किडनी रॅकेट उघडकीस आणलं आहे. तमिळनाडूच्या त्रिची येथे किडनी काढण्यात येत असल्याचा धक्कादायक खुलासा चंद्रपूर पोलिसांनी केला आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**किडनी रॅकेट उघड**

चंद्रपूर मधील एका शेतकऱ्याने सावकारी जाचाला कंटाळून किडनी विकली होती. रोशन कुडे असे या शेतकऱ्याचे नाव आहे. या प्रकरणात मोहाली येथून हिमांशू भारद्वाज या आरोपीला अटक करण्यात आली होती. आरोपी हिमांशू भारद्वाज याची देखील किडनी काढण्यात आल्याचे वैद्यकीय तपासणीत समोर आलं होतं, त्यानंतर पोलिसांनी हिमांशू भारद्वाज यांने किडनी नेमकी कुठे विकली याचा तपास केला आहे.



### एका डॉक्टरला अटक

चंद्रपूर पोलिसांनी डॉक्टर रवींद्र पाल सिंग याला दिल्ली येथून अटक केली होती. मात्र ट्रान्झिट रिमांड दरम्यान दिल्ली कोटार्ने त्याला जामीन देऊन २ जानेवारीला चंद्रपूर न्यायालयात हजर होण्याचा आदेश दिला आहे. तर त्रिची येथील डॉक्टर राजरत्नम गोविंदस्वामी याला अटक करण्यासाठी चंद्रपूर पोलीस तामिळनाडूमध्ये ठाण मांडून बसले आहेत.

**तामिळनाडू कनेक्शन समोर**

हिमांशूने दिलेल्या माहितीप्रमाणे आर्थिक परिस्थिती खराब झाल्याने हिमांशू किडनी विकण्यासाठी सोलापूर येथील रामकृष्ण सुंचू याच्या संपर्कात आला. सुंचू याने त्याला तामिळनाडूच्या त्रिची येथे पाठवले व तेथे त्याची किडनी काढण्यात आली. त्रिची येथील स्टॉर किम्स हॉस्पीटल चे संचालक डॉ. राजरत्नम गोंविदस्वामी आणि डॉक्टर रवींद्र पाल सिंग याने त्याचे ऑपरेशन केले होते.

**किडनी रॅकेटचे कंबोडिया कनेक्शन**

याआधी १० ते १२ भारतीयांना कंबोडिया येथे किडनी काढण्यासाठी पाठवल्याचे समोर आले होते. कंबोडियाच्या मिल्ट्री हॉस्पीटलमध्ये या लोकांची किडनी काढण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र आता भारतातच किडनी विक्रीचं रॅकेट सुरू असल्याचे समोर आले आहे. चंद्रपूर पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. या प्रकरणाची सविस्तर चौकशी केली जाणार असून यातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मुंबईचा श्वास गुदमरतोय



**अनेक स्वप्नं उराशी बाळगत देशाच्या कानाकोपऱ्यातील लोक मुंबईत येतात. मुंबईत येण्याचा ओघ वाढल्याने मुंबईची बजबजपुरी झाली आहे. याच वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबईतील गृहनिर्माण, आरोग्य, स्वच्छता, वाहतूक, पर्यावरण, पाणी अशा विविध सुविधांवर ताण निर्माण झाला आहे.**

सात बेटांची मिळून मुंबई बनली. खाडी, तलाव, विहिरी अशा नैसर्गिक स्रोतांचा जीव घेत मुंबईत टोलेजंग इमारती, झोपडपट्टी उभ्या राहिल्या. १९०६ साली मुंबईची लोकसंख्या सुमारे १० लाखांच्या आसपास होती. आज ही लोकसंख्या दीड कोटींहून अधिक आहे. यामध्ये दरदिवशी वाढ होत असून भविष्यात हा आकडा अजून वाढणार आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे मुंबईतील पायाभूत सेवासुविधांवर प्रचंड ताण आला आहे. यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना आता अपुऱ्या पडू लागल्या आहेत. मुंबईत एकेकाळी असलेल्या चाळी, टुमदार बंगल्यांच्या ठिकाणी टॉवर उभारले आहेत. झोपडपट्टीच्या ठिकाणी इमारती होऊ लागल्या आहेत. मुंबईकरांच्या जीवनमानात सुधारणा होत असतानाच मुंबईतील वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. मुंबईत महापालिका रुग्णालयांसोबतच खासगी रुग्णालये मोठ्या संख्येने आहेत. विविध आजारांवर उपचार होत असल्याने देशाच्या कानाकोपऱ्यातून लोक इथे येतात. पूर्वी महापालिका आणि राज्य सरकारच्या रुग्णालयात होणारे उपचारही आता महाग झाले आहेत. खासगी रुग्णालयात उपचार घेणे तर सर्वसामान्य नागरिकांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. महापालिका रुग्णालयांत तर पाय ठेवण्यास जागा नाही, अशी अवस्था निर्माण झाली आहे. अनियंत्रित बांधकाम, रासायनिक उद्योग, वाढती वाहने अशा विविध कारणांनी मुंबईतील प्रदूषण वाढले आहे. प्रदूषणामुळे आरोग्याचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. वाढती वाहतूककोंडी तर मुंबईकरांची डोकेदुखी बनली आहे. या कोंडीवर उपाययोजना म्हणून उड्डाणपूल उभारण्यात येत आहेत. मात्र यानंतरही मुंबईत सकाळ असो वा संध्याकाळ अनेक मार्गांवर तासन्तास वाहनांच्या रांगा पाहावयास मिळतात. वाढत्या वाहतूककोंडीमुळे मुंबईकरांना मुंबई नकोशी वाटू लागली आहे. झोपडपट्ट्या केवळ मुंबईत आहेत असे नाही, तर जगातील अनेक देशांसमोर झोपड्यांनी आव्हाने उभी केली आहेत. देशातील इतर राज्यांमध्येही झोपड्या आहेतच. आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी धारावीची आहे. मुंबईत धारावीसारख्या अनेक भागांत झोपडपट्ट्या वाढल्या आहेत आणि वाढत आहेत. झोपडपट्टीदादांमुळे आणि राजकीय वरदहस्ताने या झोपड्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातून येणारे बहुतांश लोक मुंबईत झोपडीचा आसरा घेतात. मुंबईत होणाऱ्या स्थलांतरामुळे झोपड्या वाढण्यासह पिण्याचे पाणी, वाहतूककोंडी, अस्वच्छता असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मुंबईतील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी झोपड्यांचा पुनर्विकास करण्यात येत आहे. यामध्ये राजकीय नेते आणि विकासक संगनमताने झोपडीधारकांना त्रस्त करत आहेत. झोपडपट्टीच्या ठिकाणी इमारती उभ्या राहत आहेत. झोपडपट्टीचा विकास होताना त्या ठिकाणचे रस्ते आहेत तेवढेच राहतात. त्यामुळे येथे पार्किंगसह विविध समस्या निर्माण होतात. अशीच अवस्था जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना होत आहे. पुनर्विकासात वाढीव बांधकाम क्षेत्रफळ उपलब्ध होत असल्याने पुनर्विकासाला गती आली आहे. यातून दुप्पट ते तिप्पट घरे अधिकची उपलब्ध होत आहेत. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत सुविधा वाढत नसल्याने आहे त्या सुविधांवर ताण येत आहे. वाहतूककोंडीवर उपाय म्हणून उड्डाणपूल उभारण्यात येत आहेत, मात्र आहेत त्याच रस्त्यांवर उड्डाणपूल उभे राहत असल्याने वाहतूककोंडीच्या समस्येवर तोडगा निघालेला नाही. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत मुंबईला पाणीपुरवठा होणाऱ्या धरणांच्या संख्येत वाढ झालेली नाही. त्यामुळे नागरिकांना समान पाणीवाटप करणे पालिकेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. मुंबईची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने वाढती पाणी मागणी महापालिका प्रशासनाला पूर्ण करण्यासाठी हालचाल करावी लागणार आहे. अन्यथा मुंबईकरांना पाणी संकटाला सामोरे जावे लागणार आहे. वाढत्या स्थलांतरामुळे मुंबईत परवडणारी घरे खरेदी करणे सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेले आहे. मुंबईतील जागांचे भाव गगनाला भिडले आहेत. त्यामुळे येथे सरकारी प्राधिकरणांनाही परवडणाऱ्या किमतीमध्ये घर उपलब्ध करून देणे अशक्य बनले आहे. शहर आणि उपनगरात घराच्या किमती कोट्यवधी रुपये झाल्या आहेत. जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास सुरू झाल्याने मुंबईत भाड्याच्या घराच्या किमतीही कमालीच्या वाढल्या आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण बनू लागले आहे. मुंबई महानगर क्षेत्राचा विकास झपाट्याने झाल्याने या भागात नागरीकरण वाढले आहे. या भागातील नागरिक कामधंद्यानिमित्त मुंबईत येतात. प्रवासासाठी नागरिक लोकल सेवेवर अवलंबून असून दररोज लाखो प्रवासी प्रवास करत आहेत. गर्दीच्या वेळी लोकलमध्ये पाय ठेवण्यास जागा मिळत नाही. लोकल सेवा वाढविण्यासाठी रेल्वे प्रशासन प्रयत्न करत असले तरी हाती घेतलेले प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाहीत. रेल्वे रुळालगत झालेल्या अनधिकृत बांधकामांमुळे प्रकल्प वेळेत मार्गी लागत नसल्याने रेल्वे सेवेवरील ताण कमी होण्याची शक्यता तूर्तास तरी दिसत नाही. मुंबईत वाढत्या स्थलांतरामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत आणि भविष्यात निर्माण होणार आहेत. याचा साकल्याने विचार करून त्यादृष्टीने प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# आशावादी राहण्याशिवाय मतदार काय करेल?

सध्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीच्या वातावरणाने राज्य ढवळून निघत आहे. राज्याची जवळपास निम्मी लोकसंख्या शहरांत राहते. ५२ टक्के लोक शेतीवर उपजिविका करत असले तरी त्यांच्या घरातल्या प्रत्येकाला शेतीच्या आधारावर जगता येत नसल्याने काहीजण शहरात आहेत. तसेच शिक्षण, नोकरी, व्यवसाय यासाठी शहरांमध्ये आलेले लोकही आहेत.



महानगरपालिकांच्या निवडणुका जवळ आल्या की, राजकीय समीकरणांची गर्दी होते; पण शहरात राहणाऱ्या नागरिकांचे खरे प्रश्न मात्र कोलाहलात हरवतात. अशा वेळी आशावादी राहण्याशिवाय मतदारांच्या हाती तरी काय उरते?

या महानगरपालिकांसाठी ३.४८ कोटी मतदार आहेत. अधिकाधिक लोकांनी मतदान करून लोकशाही व्यवस्था बळकट करावी असे आवाहन केले जाईल. निवडून कोण येणार, ठाकरे बंधूंचे काय होणार, भाजपा यशाची परंपरा कायम ठेवणार का.. एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालची शिवसेना कशी कामगिरी करणार, वंचित बहुजन आघाडीसोबत युती केल्याने काँग्रेसला काय फरक पडेल, पवारांच्या दोन्ही राष्ट्रवादी पुणे, पिंपरी-चिंचवडचे वर्चस्व राखणार का, याच्या उत्सुकतेत आपल्या नागरी जीवनाचा दर्जा काय याची चर्चा हरवून जाईल. आपण जेवढे कर देतो, त्या बदल्यात कशा आणि किती सुविधा मिळतात ही चचार्सुद्धा हरवून जाईल.

राजकीय पक्षांनी त्यांच्या नेत्यांसाठी, कार्यकर्ते व समर्थकांसाठी चालविलेल्या व्यवस्थेचे घटक बनून राहणे एवढेच मतदारांच्या हातात राहिले आहे. मुंबईत ठाकरे बंधू आपले स्थान केवळ मराठीच्या बळावर राखतील का, अजित पवारांच्या राष्ट्रवादीने इथे स्वतंत्र निवडणूक लढविताना जाणीवपूर्वक मुस्लीम व महिला उमेदवार देत प्रत्येक वार्डात काही हजार मते खाण्याची तजवीज करून महायुतीतल्या आपल्या दोन मित्र पक्षांना अप्रत्यक्ष मदत करण्याचा डाव रचलाय का, रामदास आठवले यांच्या रिपब्लिकन पक्षाने स्वतंत्र उमेदवार उभे करावेत आणि त्यांच्या उमेदवारांनी हजार, दोन हजार मते खात काँग्रेस, ठाकरे सेना व मनसेच्या उमेदवारांची अडचण करावी, असे तर ठरले नाही? काँग्रेसची 'वंचित'सोबतची युती खा. वर्षा गायकवाड यांच्या गैरहजेरीत कशी काय जाहीर झाली, ४२ ऐवजी ६२ जागा का दिल्या, याबरोबरच नेत्यांनी आपापल्या कुटुंबात अधिकाधिक उमेदवाऱ्या देत विकासनिधीचा ओघ आपल्या अंगणात वाहत राहील अशी व्यवस्था केलीय का, अशा चर्चा रंगतील.

थोड्याफार फरकाने अशा व्यूहरचना सर्वच महापालिकांत आहेत. त्यामुळेच चित्र-विचित्र युती, आघाड्यांचे कडबोळे पहावयास मिळत आहे. सोयीनुसार हे झाल्याने कोण कुणाचा विरोधक आहे हे लक्षात येत नाही. राजकारण आता विचारांची लढाई अजिबात राहिलेली नाही. एकीकडे धार्मिक उन्मादाचा जयघोष आहे तर दुसरीकडे प्रतिस्पर्धी संपवायला शिताफीने वापरण्यासाठी ओवेसींची एमआयएम, समाजवादी पार्टी कामाला कशी येईल याचे नियोजन आहे. ती कशी हे छत्रपती संभाजीनगर, मुंबई आदी महापालिकांत दिसेल. मुंबई व पुण्यात ज्यांना उमेदवारी देणे अडचणीचे वाटते ती राष्ट्रवादीने द्यावी याची व्यवस्था झाल्याचे दिसते आहे. कोणत्या महापालिकेत कोणता पक्ष स्वतंत्रपणे लढला किंवा कोणाला सोबत घेऊन लढला तर मतदानावर फरक पडेल व ती पालिका ताब्यात येण्याची व्यवस्था होईल, याची पटकथा, नेपथ्यरचना आखून या निवडणुका पार पडत आहेत. हे मतदारांच्या लक्षात आले फारच उत्तम.

एवढे होऊनही काही गडबड झालीच तर काँग्रेस राजवटीत नंदलाल चौकशी समित्यांसारखा प्रयोग झाला तसा पुढेमागे होण्याची शक्यता नाकारता येत नाही. १९९५ पूर्वी नगरविकास मंत्री कोण हे फार लोकांना माहिती नसे. ९५ पासून हे खाते प्रामुख्याने मुख्यमंत्र्यांकडे व नंतर वजनदार राजकारण्यांकडे राहिले आहे. काँग्रेस राजवटीत विरोधी पक्षाच्या ताब्यातल्या महापालिकांना बेजार करण्यासाठी नंदलाल समितीचा वापर झाला. त्यांनी अनेक गंभीर बाबी समोर आणल्या. त्याने तेथील नेतेमंडळी बेजार झाली. पण नंतर राजकीय सौहार्दात खेळीमेळीत गंभीर मुद्दे जिरले.

याउपर महापालिकांना विकास निधीसह अनेक गोष्टींसाठी सरकारवर अवलंबून रहावे लागते. विरोधी पक्षाच्या ताब्यात महापालिका गेलीच तर सरकारी कायदे, नियम, निधीचे अधिकार व्यवस्थित वापरले जाणारच आहेत.

गेल्या ५-७ वर्षांत लोकांनी प्रशासकराज पाहिले. एरवी नगरसेवक व राजकारणी मंडळी आम्हाला काम करू देत नाहीत, असे कारण प्रशासन सांगत असते. प्रशासकीय राजवटीत आपापल्या शहरांसाठी केलेले योगदान सांगा म्हटले तर त्यातील अनेकांकडे काहीच उत्तर नाही. अतिक्रमण हा सर्वच शहरांना लागलेला भयंकर रोग आहे. त्यातील किती अतिक्रमणे हटवून पदपथ, रस्ते मोकळे केले असे विचारले तर काही सांगण्यासारखे असेल असे वाटत नाही.

प्रशासकीय राजवटीत महापालिकांतील विकास निधी सत्ताधारी लोकांच्या शिफारशीने वाटला गेला. तो सत्ताधाऱ्यांच्याच मतदारसंघांत गेला याचे तपशील मुंबईसारख्या शहरात बाहेर आले आहेत. विरोधकांच्या मतदारसंघातील रहिवाशी हे भारतीय नागरिक नव्हेत की ते कर देत नाहीत? या भागात राहणाऱ्या मतदारांना एवढी भयानक शिक्षा का बरे दिली असावी? या नागरिकांनी सुद्धा कर दिले, त्यातून प्रशासनाचे वेतन, भत्ते दिले गेले. विरोधी पक्षाच्या मतदारसंघात विकास कामांना निधी द्यायचा नसेल तर तेथील सामान्य नागरिकांकडून करसुद्धा घ्यायचे नाहीत असा निर्णय होऊ शकेल का? राजकारणाची शिक्षा सामान्य नागरिकांना देणारे आपण कोणत्या जगात राहतो आणि ही कसली मानसिकता आहे? आपली शैक्षणिक सुसंस्कृतता किती तकलादू असावी याचे हे निदर्शक आहे.

निवडणुका पार पडल्या आणि नवे लोक आले तरी गुणात्मक फरक काय पडेल याची सुजाण मतदारांना काळजी असणार. प्रगतीच्या अधिकाधिक संधी शहरांत त्यातल्या त्यात महानगरात आहेत म्हणून लोक नागरी जीवनाचा भाग झाले. त्यांना अतिक्रमणमुक्त रस्ते, वस्त्या हव्यात, चांगली नागरी परिवहन सेवा हवी, उत्तम आरोग्यसेवा आणि शैक्षणिक सुविधा हव्यात, नागरिक म्हणून विरंगुळ्यासाठी कला-क्रीडा, मनोरंजन केंद्र हवीत. या सर्व गोष्टी दर्जेदारपणे उपलब्ध व्हाव्यात म्हणून तर चांगली महापालिका हवी. यातल्या किती गोष्टी गेल्या ५-७ वर्षांत मार्गी लागल्या असा प्रश्न केला तर फारसे काही हाती लागत नाहीत.

एकट्या मुंबईत गेल्या पाच वर्षांत आगीच्या किती घटना घडल्या व किती लोक जीवाला मुकले, किती जायबंदी झाले हे पाहिले तर आपल्या नगर नियोजनाचा दर्जा कळतो. पदपथ अतिक्रमणाने व्यापले म्हणून लोक रस्त्यांवरून चालतात. गाडीखाली येतात. भांडुपला परवा बेस्टच्या बसखाली लोक चिरडून मेले. गतवर्षी कुर्ल्यात असाच प्रकार घडला. रस्त्यावरून चालणारे लोक बसखाली चिरडून मेले. प्रामाणिकपणे कष्ट करून जगू इच्छिणारांना आपण काय देतो तर स्वस्तातले मरण. याचा कुणाला खेद वा खंत? आता तिथला रस्ता अतिक्रमणमुक्त केला म्हणून बातम्या आल्या. ज्यांनी केला त्यांचा सत्कार समारंभ आयोजित करायचा की समांतर व्यवस्था चालविण्यात जे जे गुंतलेत त्यांचा?

महापालिकेतील मोठी विकासकामे कजार्तून आणि छोटी केंद्र व राज्य सरकारच्या निधीतून सुरू असतात. ती कशी करायची, नगर नियोजनात कोणत्या भूखंडावर कोणती कामे करायची, कोणते आरक्षण टाकायचे व कोणते उठवायचे, कोणत्या भूखंडांना किती बांधकाम करता येईल यासाठी परवाना द्यायचा, जादा बांधकाम झालेले कसे नियमित करायचे, पालिकांच्या ताब्यातले भूखंड कोणाला द्यायचे, कसे वापरायचे, कोणती अतिक्रमणे नियमित करायची, याच्या अधिकारांसाठीच जणू सत्ता हवी असते. मतदारांनी मात्र मतदान करून निमुटपणे आपापल्या कामाला लागायचे असते.

## अरवलीची आरोळी

मराठी माणूस, मुंबई वाचवायची हे एकमेव लक्ष्य डोळ्यासमोर ठेवून ठाकरे बंधू महापालिका निवडणुकीत एकत्र आले आहेत. नगरपरिषद, नगरपंचायत निवडणुकीचा धुराळा खाली बसत नाही, तोच आता महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली. ठाकरे बंधू एकत्र येणार... येणार असे म्हटले जात होते, अखेर शिवसेना (ठाकरे) आणि मनसे युतीचा मुहूर्त ठरला. ठाकरे बंधूंनी एकत्र येण्याचे निश्चित केले. २० वर्षांची दरी या निवडणुकीच्या निमित्ताने किंवा सत्ताधारी भाजपमुळे मिटली असेही म्हटले तर वावगे ठरणार नाही. या दोन्ही सेना एकत्र येताना त्यांची एकवाक्यता 'मराठी माणूस' आणि 'मुंबई वाचवा' या शब्दांवरती झाली आहे. काँग्रेस त्यांच्यापासून दूर गेली असली तरी त्यांचाही नारा सत्ताधाऱ्यांपासून धारावी, मुंबईतील मोक्याच्या जागा आणि मुंबईकरांना वाचवा हाच आहे. 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवून सत्तेत आलेल्या भाजपच्या १०-११ वर्षांनंतरच्या काळानंतर आता जनतेला या सत्ताधाऱ्यांपासून मराठी शाळा-जल-जंगल-जमीन आणि एकूणच माणसाला आवश्यक असणारी त्याची हक्काची जागा वाचवण्याची हाक का द्यावी लागत आहे. मुंबईतीलच नाही तर राज्यातील मराठी शाळा वाचवण्याची हाक दिली जात आहे. एकीकडे मराठी भाषा अमृताहूनी गोड असे गोडवे गायचे आणि दुसरीकडे जिथे ही भाषा रुजेल, वाढेल, वृद्धिंगत होईल त्या शाळाच डम्प करायच्या. तिथे बुलडोजर फिरवून टॉवर उभे करायचे. आमची शाळा चोरीला गेली अशी तक्रार मुंबई पोलिसांत दाखल आहे. अजून किती गतीने मराठीची अवनती करायचा विचार आहे. कांजूर डम्पिंग ग्राऊंडच्या दुर्गंधीवर तोडगा काढण्याचे आदेश कोर्टाने सरकारला दिले आहेत. सर्वच गोष्टी या कोर्टाला का सांगाव्या लागत आहेत. कल्याणकारी राज्यामध्ये सत्ताधाऱ्यांनी ज्यामध्ये जनतेचं कल्याण आहे तेच करणं अपेक्षित असताना त्यासाठी मोर्चे, आंदोलनं आणि नंतर न्यायालयाचे दार ठोठावून, कायद्याचा बडगा उगारून का सांगावं लागत आहे. नाशिकमध्ये झाडं वाचवा म्हणत अबालवृद्धांना 'चिपको आंदोलन' करावं लागलं. विकासाची कुऱ्हाड ही पहिली झाडावर पडते आणि नंतर बुलडोजर जंगल सपाट करून आता डोंगरही भुईसपाट करायला निघाले आहेत. जल-जंगल-जमीन वाचवण्याची लढाई ही फक्त आता आदिवासींची राहिलेली नाही. शुद्ध हवा-पाणी मिळण्याची धडपड आता राजधानी दिल्लीपासून रत्नागिरीतील लोटे परशुराम परिसरापर्यंतच्या नागरिकांना करावी लागत आहे. इटलीतील मिटेनी एस.पी.ए. ही रासायनिक कंपनी महाराष्ट्रातील रत्नागिरीत दाखल झाली आहे. अत्यंत घातक रसायनांचे उत्पादन या कंपनीमार्फत होते. हे केमिकल्स मानवी शरीर आणि निसर्गात दीर्घकाळ टिकून राहतात. यामुळे कॅन्सर, हार्मोनल आजार, वंध्यत्व यांसारखे गंभीर धोके वाढल्याचे स्पष्ट झाल्यानतंर इटलीतील न्यायालयाने कंपनीच्या ११ अधिकार्यांना १४१ वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. एवढी जीवघेणी कंपनी गुपचूप आपल्या महाराष्ट्रात रत्नागिरीत येते. यामुळे वशिष्ठी नदी, कोकणातील भूगर्भातील पाणी आणि आपल्या माणसांचं जीवन धोक्यात जाणार असल्याची आपल्याला कल्पनाही नसावी, हे किती भयानक आहे. याचे दुष्परिणाम दिसल्यावरच आम्ही कोकण वाचवा म्हणणार आहोत का? आज दिल्ली वाचवा, हिमालय वाचवा अशी हाक दिली जात आहे. अरावली पर्वतरांगा नष्ट करण्याचे घाटत आहे. यामुळे फक्त राजस्थान, हरियाणा, दिल्लीचीच वाळू होणार नाही तर हिमालयापर्यंत वाळू उडून जाईल. हिमालयावर वाळूचे थर जमा झाले तर बर्फ मोठ्या प्रमाणात वितळून महापुराच्या चक्रात अडकलेल्या बिहारवर नेमके कोणते संकट येईल, हे सांगणेही कठीण आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे उत्तर भारताचं पर्यावरण संकटात आलं आहे. गुजरात, राजस्थान आणि हरियाणामधील अरावली पर्वतरांगांमध्ये खाणींसाठी कोटार्ने परवानगी दिली आणि हे संकट उभं राहिलं आहे. हजारो वर्षांपासून असलेल्या या पर्वतरांगांची व्याख्या करण्यात आली आणि तिथे खाणींना रान मोकळे करून देण्यात आले. यामुळे वन्यजीव, जलवायू संकट आणि उत्तर भारताचाच वाळवंट होण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या संकटापासून वाचवा म्हणण्याची वेळ दिल्ली, राजस्थानसह एकूणच उत्तर भारतावर आली आहे. आरवली पर्वतरांगा जवळपास ६७० किलोमीटर लांब आहे. उत्तर भारताला त्यांनी थार वाळवंटापासून वाचवले आहे. सर्वोच्च न्यायालयाने खाण उद्योगांसाठी केलेल्या आरवलीच्या व्याख्येमुळे संपूर्ण आरवली पर्वतरांगा धोक्यात आल्या आहेत. जर आरवली पर्वतरांगा संपवून टाकण्यात आल्या तर मान्सून राजस्थानमध्ये न थांबता पूर्वेकडे जाईल. यामुळे राजस्थानमध्ये पर्जन्यमान कमी होईल. थर वाळवंट पूर्वेकडे सरकेल. डोंगररांगाच नसतील तर मान्सूनचे वारे न थांबताच पुढे निघून जातील. संपूर्ण उत्तर भारतात दुष्काळाची स्थिती निर्माण होईल. उत्तर भारताचे हवामानच बदलून जाईल. जंगल नष्ट झाले तर तिथले वन्यजीव, प्राणी, पक्षी कुठे जातील. या डोंगररांगांवर अवलंबून असलेले पर्यटन उद्योग, रोजगार आज आम्हाला वाचवा अशी हाक देत आहेत.

# बंदरांच्या आधुनिकीकरणातून अर्थशक्तीचा उदय

जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने 'मेरिटाईम इंडिया व्हिजन २०३०' (एआयव्ही) लाँच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे आणि क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता ह्यएमआयव्ही २०२०ह्ण हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे.

बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

२०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली. २०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती. कामकाजात लक्षणीय सुधारणा झाल्यामुळे जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे



भारताचा सुमारे ९५ टक्के व्यापार समुद्रमार्गे होतो. समुद्र हा भारताच्या व्यापाराचा जीवनमार्ग आहे. कच्चे तेल आणि कोळशापासून इलेक्ट्रॉनिक्स, कापड आणि कृषी उत्पादनांपर्यंत देशाच्या आयात आणि निर्यातीचा मोठा भाग व्यस्त बंदरांमधून जातो. जागतिकीकरणामुळे पुरवठा साखळ्यांमध्ये खोलवर परस्परावलंबन निर्माण झाले असून भारत एक प्रमुख उत्पादन आणि ऊर्जा केंद्र म्हणून उदयास आला आहे.

कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो. भारतीय अंतदेर्शीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडब्ल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. 'आयडब्ल्यूएआय'ने 'हल्दिया मल्टीमोडल टर्मिनल' (एमएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेसकडे सोपवले आहे. सरकार आणि खासगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे. जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलीकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाइड त्याच्या विशाल किनाऱ्याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्ष्यित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय सहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खचार्शी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले 'इंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटर' (आयएसटीसी) हे जहाज डिझाइन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.

ईशान्य भारतातील अंतदेर्शीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या 'क्रूझ इंडिया मिशन'अंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लँडस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला 'सागरमाला प्रकल्प' हा 'समुद्री भारत व्हिजन २०३०' आणि 'समुद्री अमृत कल व्हिजन'चा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा 'सागरी भारत व्हिजन, २०३०' ला आकार देत आहेत. हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे. हे लक्षात घेऊन 'सागरी अमृतकाल व्हिजन, २०४७' तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे. 'हरित नेव्हिगेशन' उपक्रमांसाठी सुमारे ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे.



## हे खायलाच हवं हा हट्ट वाढवू शकतो तुमच्या मुलांमधील लठ्ठपणा

आपल्या मुलाने निरोगी राहावं असं प्रत्येक आईला वाटतं. मुलं निरोगी राहण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करते. त्याच्या आहारात पौष्टिकच गोष्टींचा समावेश करते. मुलांनी बाहेरचं न खाता घरात तयार केलेलं अन्न खावं यासाठी ती तळमळीने चांगले चांगले पदार्थ शिकते. मुलांना खाऊ घालते. पण तुमची हीच पौष्टिक आणि सतत चांगलं खाण्याची सवय तुमच्या मुलांच्या आरोग्यासाठी घातक आहे ती कशी ते आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत. त्यासाठी पुढे नक्की वाचा.

सतत खायला देत राहणे

आईचं मन फारच काळजीवाहू असतं. तिला आपल्याला मुलाने सतत खात राहावे असे वाटते. म्हणजे ती आल्यावरही विचारते तुला भूक लागली का? तुला काहीतरी खायला करुन देते. मग ही दिवसभरातील कोणतीही वेळ असो तिला तिच्या मुलाने सतत खावेसे असे वाटते. तुम्ही देखील आजुबाजूला अशी अनेक उदाहरणे पाहिली असतील ज्या ठिकाणी आई आपल्या मुलांना अगदी रात्रीही घरी परतल्यानंतर खाऊ घालतात. आता तुम्ही म्हणाल यात काय चुकलं? तर तुमच्या मुलांना आवश्यक असलेल्या गोष्टी तुम्ही त्यांना देणे चांगले पण त्यांना खायला देताना तुम्ही वेळ आणि काय खायला देत आहात हे देखील बघा. कारण बरेचदा आई आपल्या मुलाचे पोट भरावे म्हणून त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खायला देतात.

तुला हे खायलाच हवं

आई आपल्या मुलांना चांगल ओळखते हे आम्हाला माहीत आहे. पण त्यांच्यावर खाण्याची जबरदस्ती करणेही चांगले नाही. तुमचं मुलं काल भरपूर जेवलं असेल म्हणून ते उद्या तितकचं जेवेल असं होत नाही. पण काही पालक मुलांच्या पानात अन्न वाढतात. त्यांना कधी कधी ते खाता येत नाही. अशावेळी काही पालक मुलांना जबरदस्ती करुन पानातील अन्न संपवायला लावतात. मुलं रडत असली तरी तुज्यासाठी हे आवश्यक आहे.तू हे खायलाचं हवे. असे सांगून आई इमोशनल ब्लॅकमेल करुन मुलांना खाऊ घालतात. पण हीच पालकांची चुकी आहे. वाढीच्या वयातील मुलांनी योग्य आहारा घ्यावा ही गोष्ट योग्य असली तरी खाण्याची जबरदस्ती तुम्हालाच पुढे त्रासदायक पडू शकते. गरजेपेक्षा जास्त जेवण जेवल्यामुळे मुलांना अपचनाचा त्रास होऊ शकतो किंवा त्यांचे वजनही वाढू शकते.

सतत पौष्टिक पदार्थ देत राहणे

आता काही आई अशा असतात ज्यांना आपल्या मुलांना कायमच पौष्टिक द्यायचे असते. अगदी सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत त्यांनी काय पौष्टिक खायला हवे याचे एक वेळापत्रक त्यांनी तयार केलेले असते. त्यांच्या या वेळापत्रकानुसार मुलांनी ते खावे असेच त्यांना वाटते. काही पालक पौष्टिक लाडू बनवतात. यामध्ये वेगवेगळी पीठ, ड्रायफ्रुट असतात.या सगळ्याचे किती प्रमाण मुलांच्या आहारात असावे हे त्यांना कळत नाही. त्यांना असे वाटते की, इतके पौष्टिक घटक पोटात गेल्यानंतर मुलाचे आरोग्य चांगले राहील.पण असे होत नाही. तुमच्या या सतत खाण्याच्या वेळापत्रकामुळे मुलांमध्ये लठ्ठपणा वाढतो. शिवाय त्यांना अन्य आजार होण्याची शक्यता असते. मुलांना सगळ्यात जास्त आई ओळखते ही गोष्ट खरी असली तरी सुद्धा कधी कधी महिला भावनेच्या भरात आपला मुलगा काहीच खात नाही म्हणून त्याला खाऊ घालतात. तुम्हाला तुमचे मुलं कुपोषित आहे असे वाटत असेल तर डॉक्टरांकडे न्या. त्यांच्या उंचीनुसार त्यांचे वजन किती असायला हवे हे विचारुन घ्या. ती यादी जवळ बाळगा. कारण तुम्ही मुलांना त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक खाण्याची सवय लावली की, त्यांना आवरणे कठीण असते आणि त्यांच्या लठ्ठपणाला नियंत्रित ठेवणे फारच कठीण होऊन बसते.

## करु नका 'या' चुका, नाहीतर होईल पोटातील अल्सर!

पोटातील अल्सर बद्दल तुम्ही ऐकून असालच! जगातील अतिगंभीर आजारांपैकी एक आजार म्हणून पोटाचा अल्सर ओळखला जातो. जेव्हा काही खाताना अन्न नलिकेत जळजळ होणे वा वेदना होणे या गोष्टीचे लक्षण आहे की पोटामध्ये अल्सर वाढतो आहे. हे अल्सर अन्न नलिकेत किंवा आतड्यांच्या आतील भागांत तयार होतात. या स्थितीमध्ये रूग्णासाठी ठोस आहार तर दूरच राहिला पण त्याला साधे पाणी पिताना सुद्धा त्रास होतो. आज आपण याच आजाराबद्दल जाणून घेणार आहोत. अल्सर म्हणजे काय? ते कसे वाढतात? ते किती गंभीर असू शकतात? याचे काय काय तोटे आहेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे या आजारावर उपाय काय? या सर्व प्रश्नांची उत्तरे तुम्हाला आज या लेखामधून मिळतील.

**अल्सर म्हणजे काय?**

अल्सर म्हणजे पोटात होणाऱ्या जखमा होय. जेव्हा हे घाव आतड्यांत किंवा अन्न नलिकेमध्ये तयार होतात तेव्हा रुग्णाला काही खाताना वा पिताना खूप वेदना होतात आणि मोठा त्रास होतो. चावलेला कोणताही पदार्थ गिळताना सुद्धा अशी जाणीव होते जसे की काहीतरी आपला गळा चिरून आतमध्ये शिरत आहे. या स्थितीत रुग्ण साधं पाणी पिताना सुद्धा घाबरतो. कारण पाणी पिताना सुद्धा खूप जळजळ आणि वेदना होतात. पोटाच्या वेगवेगळ्या भागात होणाऱ्या अल्सरच्या आजराला वेगवेगळी नावे आहेत आणि हे अल्सर तयार होण्याची कारणे सुद्धा वेगवेगळी असतात. पोटात तयार होणाऱ्या अल्सरला गॅस्ट्रिक अल्सर आणि आतड्यांत होणाऱ्या अल्सरला डुओडिनल अल्सर म्हटले जाते.

**अल्सर होण्याची कारणे**

सहसा शरीरात अल्सर हा शरीरातील आम्ल वाढल्यामुळे होतो. आम्ल म्हणजे एक प्रकारचे ॲसिडच असते. पोटात ॲसिड बनते आपल्या चुकीच्या आहारामुळे! जेव्हा आपण खूप काळ आहारात गरम आणि मसालेदार पदार्थ खातो तेव्हा शरीरातील आम्ल वाढत जाते. कधी कधी एखादे औषध जास्त काळ घेतल्याने सुद्धा ही स्थिती उद्भवू शकते. कारण ते औषध गरम असते. हे आम्ल आपल्या पचनतंत्राला हानी पोहचवून जखमा करते. काही धोकादायक जीवजंतू सुद्धा पोटात गेल्याने अल्सर तयार होतो.

**या कारणामुळे होतो अल्सर**

आतापर्यंत आपण हे जाणून घेतले की अल्सर हा सामान्यतः चुकीच्या आहार पद्धतीमुळे होतो किंवा पोटात जंतू गेल्यामुळे होतो. पण काहींची खूप धुम्रपानं करण्याची सवय, अति प्रमाणात मद्यपान किंवा खूप काळ मानसिक ताण घेऊ जगण्याची सवय सुद्धा अल्सरला कारणीभूत ठरू शकते. सध्या तरुणांमध्ये वाढत्या अल्सरच्या प्रमाणाला हीच कारणे जबाबदार असल्याचे जाणकार सांगतात. त्यामुळे या गोष्टी शक्य तितक्या टाळाव्यात आणि अल्सर पासून सुरक्षित राहावे.

**अल्सर होण्याची लक्षणे काय आहेत?**

एक कारण तर तुम्हाला लेखाच्या सुरुवातीलाच कळलं की अल्सर असणाऱ्या व्यक्तीला काहीही खाता पिताना खूप त्रास होतो. साधं पाणी सुद्धा पिता येत नाही. त्यामुळे हा त्रास जाणवू लागल्यास अल्सर असण्याची शक्यता वाढते. या वेदनेमुळे रुग्ण काही खाऊ शकत नाही आणि काहीच न खाल्ल्याने पोटात जास्त ॲसिड तयार होऊ लागते आणि ही समस्या अधिक वेदनादायी होते. पोटात अल्सर आल्यास वारंवार आंबट ढेकर येऊ लागतात. कधी कधी उलटी होते तर कधी कधी अचानक पोटात वेदना सुरु होतात. याशिवाय थकवा जाणवणे, चक्कर येणे यांसारख्या समस्या सुद्धा सुरु होतात.

**अल्सरवर उपाय काय आहेत?**

अल्सर ठीक करण्यासाठी सर्वात प्रथम म्हणजे आहारात बदल करावा लागतो. याबाबत तुम्ही अनुभवी आणि तज्ञ डॉक्टरांचाच सल्ला घ्यावा. ते तुम्हाला याबाबतीत योग्य मार्गदर्शन करू शकतील. कारण अल्सरचे प्रमाण किती आहे त्यानुसार डॉक्टर आहार ठरवून देतात. आहार तयार करताना तुम्ही कोणत्या वातावरणात राहता, आसपास स्थिती कशी आहे यासारख्या गोष्टी सुद्धा डॉक्टरांना पाहाव्या लागतात. सध्या अल्सरवर अनेक औषधे आली आहेत जी शरीरातील आम्लाचे प्रमाण कमी करतात आणि अल्सर हळूहळू ठीक होऊ लागतो. ज्यांचा अल्सर अधिक गंभीर झाला आहे त्यांच्यावर ऑपरेशन करूनच उपचार करावे लागतात.



## त्वचेसाठी वरदान आहे कडुनिंब



**कडुनिंब**

कडुनिंबाला आयुर्वेदात खूपच मोलाचं स्थान आहे. या झाडाच्या मुळांपासून ते फुलांपर्यंत सगळ्यात औषधी गुणधर्म असल्यानं त्याला वृक्ष औषधालय असंही म्हटलं जातं. विशेष म्हणजे ज्यांना आपल्या त्वचेचं सौंदर्य खुलवायचं असेल त्यांच्यासाठी कडुनिंब म्हणजे वरदान होय.

**रक्त शुद्ध होते**

रक्त शुद्ध करण्यासाठीही कडुनिंबाचा उपयोग होतो. रक्त शुद्ध झाल्यानं त्वचेच्या अनेक समस्या या दूर होतात.

**मुरुम, पुरळ दूर होते**

कडुनिंबाच्या पानात बुरशीनाशक व जंतुनाशक गुण आहेत. त्यामुळे चेहऱ्यावर आलेले मुरुम, पुरळ यामुळे दूर होतात. त्यामुळे सौंदर्यप्रधानांपेक्षा मुरुम दूर करण्यासाठी कडुनिंब हे अधिक फायदेशीर असतं.

**त्वचा रोगावर रामबाण**

कडुनिंब तेलात फॅटी ॲसिड व ई जीवनसत्त्व आहेत त्यामुळे खरुज, नायटा यांसारख्या व्याधी सहज बऱ्या होतात.

**केसांच्या आरोग्यासाठीही उत्तम**

कडुनिंबाच्या पानांची पेस्ट ही केसांसाठी उत्तम कंडिशनर आहे. त्याचप्रमाणे कडुनिंबाची पानं उकळवून त्या पाण्यानं केस धुतल्यास घामामुळे येणारे खाज दूर होते. तसेच कोंड्याची समस्याही निघून जाते.

## मधुमेहामुळे या महत्त्वाच्या अवयवांवर होतो दुष्परिणाम

मधुमेह किंवा डायबेटिस हा बदललेल्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या विविध आजारांपैकी एक आहे. मधुमेहाच्या विळख्याने आपणा भारतीयांना अक्षरशः गिळंकृत केलेले आहे. मधुमेहाचे, टाइप-१ आणि टाइप-२ असे दोन प्रकार आहेत. टाइप-१ या प्रकारात शरीरात इन्सुलीन स्त्रवत नाही किंवा ते अत्यंत कमी प्रमाणात स्त्रवते. हे रुग्ण इन्सुलीनच्या इंजेक्शनशिवाय जगू शकत नाही. टाइप-२ या प्रकारात इन्सुलीन कमी प्रमाणात स्त्रवते, पण या रुग्णांमध्ये गोळ्यांमुळे मधुमेह आटोक्यात येऊ शकतो.

**मधुमेहाची कारणे** : आई, वडील किंवा कुटुंबातील सदस्यांना मधुमेह असेल तर मुलांना होण्याची शक्यता जास्त असते. मधुमेहाची सुरुवात साधारणपणे ४० ते ५० या वयादरम्यान होते. लठ्ठ व्यक्तींना लठ्ठपणाबरोबर ब्लडप्रेशर आणि कोलेस्ट्रॉल जास्त असेल तर त्यांना मधुमेह होण्याची शक्यता जास्त असते.

**दुष्परिणाम टाळण्यासाठी उपाय** : शरीरातील कोलेस्ट्रॉल आटोक्यात ठेवण्यासाठी स्निग्ध पदार्थांचे सेवन कमी करावे. गरज भासल्यास औषधे घ्यावीत. वेळोवेळी डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. त्यांनी सांगितलेल्या तपासण्या कराव्यात. हे सर्व केल्यास एकतर तुम्ही मधुमेह होण्यापासून स्वतःचा बचाव करू शकता किंवा मधुमेह झाल्यास त्याची नीट काळजी घेऊन त्यापासून होणारे वाईट परिणाम टाळू शकता.

मधुमेहाची लक्षणे : भूक जास्त लागणे, तहान जास्त लागणे, लघवी जास्त लागणे, जखम लवकर बरी न होणे, पायांमध्ये मुंग्या येणे, लघवीमध्ये जळजळ होणे, योनीमार्गाचे इन्फेक्शन होणे, थकवा वाटणे, गोड जास्त खाण्याची इच्छा होणे ही मधुमेहाची लक्षणे आहेत. काही वेळा मधुमेह हा ऑपरेशनपूर्वी करावयाच्या शुगर टेस्टमुळे समजतो. मधुमेह शरीरातील एकूण एक अवयवांवर परिणाम करतो. यात प्रामुख्याने किडनी, हृदय, रेटिना, पायातील नसा, पायाला रक्तपुरवठा करणाऱ्या वाहिन्या या अवयवांवर जास्त परिणाम होतात.

**रक्त शर्करेचे प्रमाण किती असावे?**

मधुमेहामध्ये सतत वाढलेल्या साखरेच्या प्रमाणामुळे सगळ्या महत्त्वाच्या अवयवांवर परिणाम होऊन त्याचे विकार उद्भवतात. साधारणतः आठ ते दहा तास उपाशीपोटी राहून केली जाणारी शुगर टेस्ट म्हणजे 'फास्टिंग ब्लड शुगर'. ती ब्लड शुगर शंभरपेक्षा कमी हवी. जेवणानंतर दोन तासांनी केलेली ब्लड शुगर १४०पेक्षा कमी हवी. यापेक्षा ब्लड शुगर जास्त असेल तर मधुमेहाची शक्यता जास्त असते.

**प्रतिबंधात्मक उपाय** : जास्त गोड खाल्ल्याने मधुमेह होतो अशी लोकांची धारणा असते, तर तसे नाही. मधुमेह झाला तर गोड खाऊ नये हे तत्त्व आहे. सात्विक आहार घ्यावा. भूक नसल्यास खाऊ नये. जेवणातील तळलेल्या पदार्थांचे प्रमाण कमी करावे. नियमितपणे व्यायाम करावा. रोज ३०-४५ मिनिटे चालणे हा एक सहजसोपा व्यायाम आहे. हे करताना नेमकी गती पाळली पाहिजे. जवळपास जाताना पायीच जावे.




## साधू,संतांचे जीवन खडतर

सर्वसामान्य माणूस आणि संत किंवा महापुरुष यांच्या जीवन जगण्याच्या पध्दतीत फरक आहे. संतांचे जीवन खडतर असते ते काटेकोरपणाने नियमांचे पालन करतात म्हणूनच निश्चित केलेल्या ध्येयापर्यंत पोहोचतात. साधूंना पूर्व जीवनाचा परिचय देण्याची अनुमती नसते. साधूंचे जीवन संयमधारी असते. स्वतः खडतर जीवन जगून सर्वसामान्यांच्या आयुष्यात प्रकाश देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

भौतिक सुखापासून ते सतत दूर असतात. सर्वसंग परित्याग करुन संत, साधू आत्मिक सुखाचा मार्ग शोधतात. जीवनात आचारसंहिता पाळली तरच जीवन योग्य मार्गावर चालते. साधू संतांच्या आचार-विचारावर नेहमी चर्चा होते. सम्यक दृष्टीने साधू जीवन जगतात, जीवनात शिस्त पाहिजे म्हणजे आयुष्याचा खरा अर्थ समजतो. सर्वसामान्य माणूस जर धर्मानुसार वागला तर समाज बदलण्यास वेळ लागणार नाही. संतांच्या जीवनाचा अभ्यास करा. मगच त्यांच्या संदभानुसार वागायचा प्रयत्न करा. संत आणि सामान्य माणूस यांच्यात जमीन अस्मानचे अंतर आहे. नराचा नारायण व्हायचा असेल तर जीवनाला शिस्त लावलीच पाहिजे. कठोर साधनेशिवाय कोणतीही ध्येयपूर्ती, लक्ष प्राप्ती होत नाही. मनावर ताबा ठेवण्यातच प्रत्येकाचे हीत आहे. चातुर्मासात साधना केल्यामुळे मानसिक शांतता लाभते. आत्मिक व शरीर शुध्दीचा अनुभव मिळतो. साधूंवर काही बंधने असतात.


भोगाने नाही तर योगाने माणूस यशस्वी जीवनाकडे वाटचाल करु शकतो. प्रत्येकाने प्रत्येक संकटाचा खंबीर मुकाबला करुन जीवन जगण्याचा प्रयत्न केला पाहिजे. लाच घेण्याची प्रवृत्ती नष्ट झाली तर भ्रष्टाचाराचा समूळ नायनाट होईल. कायदा पायदळी तुडविण्याच्या वृत्तीला अटकाव घालण्याची गरज आहे.

**महापुरुषांचे जीवन प्रेरणादायी असते**

श्रावण महिना हा वर्षातील अतिशय चांगला महिना आहे. कधी पाऊस, कधी ऊन अशी निसर्गाची रुपे आपणास पाहता येतात. श्रावण महिना सर्वांनाच आकर्षित करतो. सूर्य अंधाराला दूर करतो. फुल देखील सुगंध देते. महापुरुषांचे जीवन देखील प्रेरणादायी असते. समाजाला योग्य मार्गावर चालण्यासाठी मदत करते.

महापुरुष लोककल्याणाचे कार्य करतात. स्व.पू श्री अमृतकंवरजी महाराजांचे श्रीरामपूरशी जवळचे नाते आहे. त्यांनी अंतिम श्वास श्रीरामपूरात घेतला. त्यांचा स्वभाव श्रीफळ (नारळ) प्रमाणे होता. वरुन कडकपण आतून मऊ, पौष्टीक होता. त्यांच्या वास्तव्याने श्रीरामपूर पुण्यभूमी ठरली आहे.

## योगसाधनेने मिळवा सुंदर त्वचा



भगवान योग केल्याने शरीराला अनेक फायदे होतात. त्यासोबतच त्वचा आणि केसांनाही याचा फायदा होतो. सुंदर त्वचा आणि चमकत्या केसांसाठी प्राणायम सर्वात महत्त्वपूर्ण मानलं जातं. यामुळे ताण कमी होतो. रक्तात ऑक्सिजनचं प्रमाण वाढून रक्ताभिसरण सुरळित होण्यास मदत होते. योगासनांमुळे शारीरिक, मानसिक स्वास्थ उत्तम राहतं. नाडी तंत्र सुरळित होतं. मानसिक तणावापासून मुक्ती मिळण्यास मदत होते. सौंदर्यासाठी योग आवश्यक आहे. योगमुळे शरीराला पर्याप्त मात्रामध्ये पोषाहार प्राप्त होतो. योगमुळे त्वचेमध्ये असणारे विषारी द्रव्य बाहेर काढण्यास मदत होते. योगासनांमुळे त्वचेला ऑक्सिजन मिळण्यास मदत होते. त्वचा रोगांपासून मुक्ती मिळण्यास मदत होते. ही प्रक्रिया केसांसाठीही लागू होते. जेव्हा एखाद्याला तणाव वाटतो, त्यावेळी मस्तिष्क, रक्तात एड्रेनालाइन सोडतं. एड्रेनालाइनमुळे हृदयाचे ठोके जलद होतात. त्यामुळे ब्लड प्रेशर वाढतं. सतत तणावात राहिल्याने हृदयाशी संबंधी समस्यांचा धोका वाढतो. जे लोक अधिक तणावात राहतात, त्यांना इतरांच्या तुलनेत हृदय रोग होण्याची शक्यता अधिक असते. दररोज योग केल्यास ताण-तणावापासून दूर राहण्यास मदत होते. दरवर्षी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा केला जातो. लोकांमध्ये योगप्रति जागरुकता निर्माण करणं हा जागतिक योग दिवस साजरा करण्यामागचा उद्देश आहे. यावर्षी १ ते ७ मार्च २०२० हा आठवडा योग सप्ताह म्हणून साजरा करण्यात येत आहे.

## शिळा भात खाण्याचे आरोग्यदायी फायदे



अनेक जणांना भात खाण्याची भीती असते. कारण भात खाल्याने वजन वाढण्याची भीती असते. परंतु, हाच भात आरोग्यास देखील तितकाच लाभदायक आहे. त्यामध्ये जर शिळा भात खात असाल तर अति उत्तम. कारण शिळा भात हा आरोग्यास लाभदायी आहे. जाणून घेऊया शिळा भात खाण्याचे आरोग्यदायी फायदे.

शरीराचे तापमान नियंत्रित राहते - शिळा भात खाल्याने शरीर थंड राहते. त्यामुळे रोज जर शिळा भात खाल्ला तर तुमच्या शरीराचे तापमान देखील नियंत्रणात राहण्यास मदत होते.

बद्धकोष्टतेची तक्रार दूर होते - भातात भरपूर प्रमाणात फाइबर्सचे प्रमाण असते. त्यामुळे शिळा भात खाल्ल्यास त्याचा अधिक फायदा होतो आणि बद्धकोष्टतेची तक्रार दूर होते.

चहा, कॉफी पिण्याची सवय मोडेल - बऱ्याच जणांना चहा आणि कॉफीचे सेवन करायची सवय असते. ही सवय सोडण्यासाठी अनेक प्रयत्न देखील केले जाता. मात्र, तरी देखील सवय मोडत नाही. अशावेळी जर तुम्ही सकाळी भाताचे सेवन केल्यास तुमची ही सवय मोडण्यास मदत होते.

ताजेतवाने रहाल - शिळा भात तुम्हाला ताजेतवाने ठेवण्यास मदत करतो. यामुळे दिवसभर काम करण्याची ऊर्जा देखील मिळण्यास मदत होते.

अल्सरची समस्या होईल दूर - तुम्हाला जर अल्सरचा त्रास असेल तर आठवड्यातून तीनवेळा शिळ्या भाताचे सेवन करावे. यामुळे तुमची अल्सरची समस्या दूर होण्यास मदत होईल.

## अशी घ्या काळजी अंडी खाताना



सर्वसामान्य संडे हो या मंडे रोज खाओ अंडे असं म्हटलं जातं. तसेच व्हिटामिन ए , डी बरोबरच मुबलक प्रोटीन्स असलेली अंडी तब्येतीसाठी उत्तम असली तरी ती पचायला उष्ण असतात. त्यामुळे अंड्याचे पदार्थ खाताना काय काळजी घ्यावी याची माहीती असणं आवश्यक आहे, अन्यथा अंडी अंगी लागण्याएवजी अंगाशी येण्याची शक्यता आहे. त्यासाठीच या काही खास टिप्स. अंड खाताना एकतर ते पूर्ण शिजलेले असावे किवां पूर्ण कच्चे असावे. अर्धे कच्चे किंवा अर्धे शिजलेले अंड तुम्हाला त्रासदायक ठरू शकते. अर्ध शिजलेली अंडी खाल्ल्याने पोटाच्या समस्या, उलटी होणे, शरिराला सूज येणे किंवा अस्वस्थ वाटणे यासारख्या समस्या उद्भवू शकतात. हृद्यरोगाचा त्रास असणाऱ्या व्यक्तिंनीही अंड्यातील बलक खाणं टाळावं. त्यामुळे रक्तवाहिन्यांमध्ये चरबी वाढून शारीरिक समस्या निर्माण होण्याची शक्यता असते. जर तुम्हाला हाय ब्लड-प्रेशर किंवा डायबीटीसचा त्रास असेल तर अंड्यातील सफेद भाग खावा. अंड्यातीस पिवळा भाग खाणे हानिकारक ठरू शकते. एका संशोधनानुसार अंड्याचे अधिक सेवन केल्याने प्रोटेस्ट कॅन्सर होण्याची शक्यता असते. त्यामुळे अंडी खाताना या सर्व गोष्टींची काळजी घेणे गरजेचे आहे.

## रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आहारात करा या मसाल्यांचा वापर



भारतीय खाद्यपदार्थांमध्ये निरनिराळ्या मसाल्यांचा वापर केला जातो. या मसाल्यांच्या वापरामुळे खाद्यपदार्थांना विशिष्ठ चव येते. भाजीच्या वाटणात आणि फोडणीसाठी वापरण्यात येणारे हे मसाले खाद्यपदार्थांना रूचकर करतात. ज्यामुळे प्रत्येक गृहिणीच्या स्वयंपाकघरात या गरम मसाल्यांना विशिष्ठ स्थान असते. एवढंच नाही तर या मसाल्यांचा तुमच्या आरोग्यावरही चांगला परिणाम होतो. तुमच्या स्वयंपाकघरातील मसाल्यांचा डब्यातील हळद, जिरे, दालचिनी, काळमिरी आणि ओवा यासारखे काही विशिष्ठ मसाले तुम्हाला रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी नक्कीच उपयुक्त ठरू शकतात. म्हणूनच आजारपण आणि इनफेक्शनपासून दूर राहण्यासाठी आहारात या मसाल्यांचा वापर जरूर करा.

दालचिनी - दालचिनीमध्ये भरपूर प्रमाणात ॲटिऑक्सिडंट असतात. ज्यामुळे सुगंधासोबत दालचिनी तुमच्या जेवणाला हेल्दी देखील करत असते. अनेक ॲलोपॅथी आणि आयुर्वेदिक औषधांमध्ये दालचिनीचा वापर केला जातो. दालचिनीमध्ये कॅन्सरपासून बचाव करणारे गुणधर्म असतात. शिवाय यामुळे मधुमेह नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. दालचिनीचा वापर आहारात केल्यामुळे तुमच्या हृदयाचे कार्य सुरळीत सुरू राहते. मेंदूचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी आणि कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी दालचिनी फायदेशीर ठरते. म्हणूनच आजारपणापासून दूर राहण्यासाठी आहारात दालचिनीचा वापर जरूर करा.

हळद - हळद हा भारतातील असा एक मसाला आहे ज्याचा वापर प्राचीन काळापासून औषधाप्रमाणे केला जातो. हळदीमुळे रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. म्हणून आजारपणातून बरे होण्यासाठी हळदीचे दूध घेण्याचा सल्ला दिला जातो. हळदीमध्ये ॲटि ऑक्सिडंट भरपूर प्रमाणात असतात. यासाठीच जर तुम्हाला इनफेक्शनची भिती वाटत असेल तर आहारात हळदीचा वापर करण्यास मुळीच विसरू नका. सर्दी- खोकल्यावर मधातून हळदीचे चाटण घेतल्यास नक्कीच बरे वाटते.

जिरे - जिऱ्यामध्ये भरपूर प्रमाणात मॅग्नेशियम आणि लोह असतं. यासाठीच आहारात जिऱ्याचा वापर करणं फार गरजेचं आहे. जिऱ्याची फोडणी दिलेले खाद्यपदार्थ खाण्यामुळे तुमचे आरोग्य उत्तम राहण्यास मदत होते. गर्भवती महिला, स्तनपान देणाऱ्या महिला, आजारी माणसे, लहान मुले यांच्या आहारात जिऱ्याचा वापर जरूर करा. अपचनाचा त्रास होत असेल तर पाण्यातून जिरे पावडर घेतल्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते. याचप्रमाणे श्वसनाच्या समस्या आणि संसर्गजन्य रोगांपासून दूर राहण्यासाठी जिरे फारच गुणकारी आहे.

जायफळ - बऱ्याचदा एखाद्या गोड पदार्थाला सुंगध देण्यासाठी जायफळाची पावडर वरून भुरभुरली जाते. जायफळामुळे शरीरातील फायबर्सवर नियंत्रण ठेवण्यास मदत होते. शिवाय यामुळे तुमची पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. दातांच्या समस्या असल्यास जायफळाची पावडर पाण्यात मिसळून चूळ भरण्याचा सल्ला दिला जातो. कारण त्यामुळे दातांची कीड कमी होते. सर्दी, खोकल्यासारख्या संसर्गजन्य रोगांना दूर ठेवण्यासाठी जायफळाचा वापर केला जातो. म्हणूनच इनफेक्शनपासून दूर राहण्यासाठी आणि रोगप्रतिकार शक्ती वाढवण्यासाठी आहारात जायफळाचा वापर अवश्य करा.

ओवा - ओवा हा एक असा मसाल्याचा पदार्थ आहे ज्यामध्ये अनेक पाचक गुणधर्म असतात. ओवा चवीला तिखट, कडवट आणि आंबट असतो. ओव्यामध्ये लोह, कॅल्शियम, पोटॅशियम, आयोडीन, कॅरोटीन असते. शिवाय यामध्ये फायबर, काबोर्हायड्रेट, प्रोटीन्सदेखील काही प्रमाणात असतात. ओव्यामधील थायमॉल या जंतूनाशक घटकांमुळे वातावरण शुद्ध होते. त्यामुळे ओव्याचा नैसर्गिक औषध म्हणून वापर केला जातो. भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये अनेक पदार्थांमध्ये ओवा आवर्जून वापरला जातो. कारण त्यामुळे पदार्थ रुचकर होतात.

काळीमिरी - काळीमिरीचा वापर अनेक खाद्यपदार्थांमध्ये आवर्जून केला जातो. कारण यामुळे तुमची पचनसंस्था सुरळीत राहते. काळीमिरी हा एक उष्ण गुणधर्म असलेला गरम मसाला आहे. ज्यामुळे तुमचे अनेक आजारपणांपासून संरक्षण होऊ शकते. शिवाय यातील बीटा कॅरेटिन, व्हिटॅमिन ए आणि सी मुळे तुमची रोगप्रतिकारशक्ती देखील वाढते. म्हणूनच आजारपणांपासून दूर राहण्यासाठी आहाराच काळीमिरीचा वापर अवश्य करा.

हिंग - भारतीय स्वयंपाकाघरात हिंगाची डबी असतेच. हिंग निरनिराळ्या भाज्या, डाळी, खिचडीच्या फोडणीसाठी वापरलं जातं. हिंगामुळे पदार्थाला विशिष्ठ चव येते. हिंग केवळ स्वादासाठीच फोडणीत वापरलं जातं असं नाही तर त्यामागे खूप मोठं आहारशास्त्रदेखीलआहे. हिंग वापरल्यामुळे त्या पदार्थांची चव आणि पोषणमुल्यं दोन्ही वाढतात. शिवाय हिंग वापरल्यामुळे अनेक विकार तुमच्यापासून दूर राहतात. वातावरणातील बदल आणि वाढणारे प्रदूषण याचा परिणाम शरीरावर होत असतो. वातावरणातील बदलांमुळे आजकाल वारंवार सर्दी-खोकला यासारखे संसर्गजन्य आजारांचा सामना करावा लागत असतो. मात्र जर तुम्हाला सतत सर्दी, खोकला होत असेल तर तुम्ही हिंगाचा वापर करून त्यापासून सुटका मिळवू शकता. हिंग, मध आणि आल्याचा रस एकत्र करून त्याचे चाटण घेतल्याने तुम्हाला नक्कीच आराम मिळू शकतो.

# महाराष्ट्राला 'जागतिक व्यवसाय केंद्र' करण्याचे उद्दिष्ट

■ बातमी /लेख,
प्रीती दिपक नाईक

राज्याच्या नव्या 'उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण २०२५'मध्ये महाराष्ट्र हे एक प्रमुख 'जागतिक व्यवसाय केंद्र' करण्यावर भर देण्यात आला आहे. यानुसार त्यात सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्रावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. 'विकसित भारत'च्या धर्तीवर 'विकसित महाराष्ट्र २०४७' या दृष्टीकोनाशी सुसंगत राहून कंपनी कायदा २०१३ अंतर्गत 'महाराष्ट्र गुंतवणूक' या कंपनीची स्थापना करण्याची योजना महायुती सरकारने आखली आहे.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला, ११ डिसेंबर रोजी नागपूर येथे झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत या धोरणास मंजुरी देण्यात आली होती. राज्याची अर्थव्यवस्था ट्रिलियन डॉलर बनवण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी स्मार्ट उत्पादनांचा विकास, रोजगारनिर्मिती तसेच शाश्वत व आत्मनिर्भर औद्योगिक क्षेत्राच्या उभारणीवर भर दिला जाणार आहे.

या उपक्रमांतर्गत औद्योगिक विकासाला चालना देत संतुलित प्रादेशिक विकास सुनिश्चित करण्यासाठी 'महाराष्ट्र गुंतवणूक' हा एक एकात्मिक डिजिटल मंच म्हणून विकसित केला जाणार आहे.

या अनुषंगाने राज्य सरकारने काही महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. बुधवारी जारी करण्यात आलेल्या शासकीय निर्णयानुसार (जीआर) उद्योग विभागाचे नाव 'उद्योग, गुंतवणूक व सेवा विभाग' असे करण्यात येणार असून, उद्योग संचालनालयाचे अद्ययावतीकरण करून 'उद्योग आयुक्तालय' करण्यात येणार आहे. नव्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आणि उत्पादन व सेवा क्षेत्रांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्याने १.१८ लाख कोटी रुपयांच्या अंदाजित खचार्ला मंजुरी दिली आहे. आवश्यकता भासल्यास अतिरिक्त निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही या शासकीय निर्णयात नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय, २०१९ पासून अंमलात असलेल्या एकात्मिक प्रोत्साहन योजनेमध्ये सुधारणा करण्यात येणार असून, नवी प्रोत्साहन योजना लवकरच जाहीर केली जाणार आहे. अधिक थेट परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी स्वतंत्र कार्यपद्धती मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातील, असे सरकारने स्पष्ट केले आहे. संबंधित सर्व विभागांना त्यानुसार आवश्यक आदेश जारी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



**३ हजार कोटी उपलब्ध होणार**

नव्या ह्यमहाराष्ट्र गुंतवणूकह्व संस्थेसाठी राज्याच्या अर्थसंकल्पाद्वारे ३ हजार कोटी रुपये उपलब्ध करून दिले जाणार आहेत. तसेच लघुउद्योग क्षेत्रासाठी विविध योजना प्रभावीपणे राबवण्यासाठी स्वतंत्र ह्यएमएसएमई आयुक्तालयह्व स्थापन करण्यात येणार आहे. याशिवाय सेवा क्षेत्र आणि नव्या तंत्रज्ञानाच्या विकासासाठी सेवा आयुक्तालय स्थापन केले जाणार आहे.

# मिरा- भाईंदरमध्ये ३३ माजी नगरसेवकांना तिकीट नाकारले

■भाईंदर। प्रतिनिधी,



मिरा-भाईंदर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्यानंतर सर्व राजकीय पक्षांकडून उमेदवारी देण्यात आली आहेत. परंतु, यावेळी महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी मिरा-भाईंदरमधील आधीच्या ९५ माजी नगरसेवकांपैकी भाजपच्या २४ आणि काँग्रेसच्या ९ अशा एकूण ३३ माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारत नव्या उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. मिरा-भाईदर महापालिका निवडणुका जाहीर झाल्यापासून इच्छुकांची गर्दी वाढली होती. विविध पक्षांनी इच्छुकांचे अर्ज भरून त्यांच्या मुलाखती घेतल्या. आपल्याला उमेदवारी मिळावी यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. युती होणार, महाविकास आघाडी होणार असे बोलले जात होते. यासाठी सर्व पक्षाकडून प्रयत्न देखील सुरू होते. परंतु शेवटपर्यंत युती, आघाडी झाली नाही. त्यामुळे सर्व पक्ष स्वबळावर निवडणूक लढवत आहेत. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया मंगळवारी पूर्ण झाली. या निवडणुकीत शहरातील प्रमुख राजकीय पक्षांमध्ये युती झाली नसल्यामुळे अनेक इच्छुक उमेदवारांना निवडणूक लढवण्याची संधी मिळाली आहे. गेल्या निवडणुकीत नगरसेवक म्हणून निवडून आलेल्या भाजप, काँग्रेस आणि शिवसेना या पक्षांमध्ये फेरबदल करण्यात आले आहेत. तर भाजप व काँग्रेसने काही नगरसेवकांचे तिकीट कापले आहे. भाजपच्या माजी ६१ जागांपैकी तब्बल २४ माजी नगरसेवकांचे तिकिट कापले आहे. तर काँग्रेस पक्षाने त्यांच्या माजी नगरसेवकांपैकी ९ माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारत नव्या उमेदवारांना संधी दिली आहे. शिवसेनेत मात्र माजी नगरसेवकांचे तिकीट कापण्याऐवजी त्यांच्या प्रभागांमध्ये बदल केले आहेत.

**पालिका निवडणुकीत सर्व पक्ष स्वबळावर**

मिराझ्रभाईंदर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने ३० डिसेंबर रोजी शेवटच्या दिवशी उमेदवारांचे अर्ज भरण्यासाठी निवडणूक कार्यालयात इच्छुकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. मिराझ्रभाईंदर निवडणुकीत इतके दिवस चाललेला जागावाटपाचा तिढा सुटू शकला नाही.त्यामुळे या वेळेला भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी (अजित पवार गट), काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), या पक्षांच्या उमेदवारांनी आपापला उमेदवारी अर्ज भरला आहे. तर यावेळी अनेक दिग्गज नगरसेवकांचे तिकीट त्या त्या पक्षाने कापल्याने रोष व्यक्त करत त्यांनी सुद्धा अपक्ष फॉर्म भरलेला आहे. मिरा झ्र भाईंदर महानगरपालिकेच्या २४ प्रभागांतील ९५ जागांसाठी महायुती व महाविकास आघाडी यांच्या जागा वाटपाचा तिढा न सुटल्याने कोणताही ठोस निर्णय होऊ शकला नाही. त्यामुळे शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षाच्या उमेदवारांनी अर्ज दाखल करण्यासाठी मिराझ्रभाईंदर महानगरपालिकेच्या सात निवडणूक कार्यालय केंद्रावर मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

# नाशिक-सोलापूर-अक्कलकोट कॉरिडॉरला केंद्राची मंजुरी

■नवी दिल्ली। प्रतिनिधी,

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहारविषयक कॅबिनेट समितीने बुधवारी देशातील पायाभूत सुविधांना गती देणाऱ्या दोन प्रमुख महामार्ग प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या प्रकल्पांची एकूण अंदाजित किंमत २० हजार ६६८ कोटी रुपये आहे. यामध्ये महाराष्ट्रातील नाशिक-सोलापूर-अक्कलकोट (३७४ किमी) हा सहा पदरी ग्रीनफिल्ड कॉरिडॉर आणि ओदिशातील एनएच-३२६ (२०६ किमी) रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाचा समावेश आहे. कॅबिनेटने महाराष्ट्रात 'बीओटी' (टोल) मोडवर ३७४ किमी लांबीच्या नाशिक-सोलापूर-अक्कलकोट कॉरिडॉरच्या बांधकामाला मंजुरी दिली आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत १९ हजार १४२ कोटी रुपये आहे. हा कॉरिडोर नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर या महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडत कुरनूलपर्यंत संपर्कता मजबूत करेल. हा उपक्रम पीएम गतीशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅनअंतर्गत एकात्मिक वाहतूक पायाभूत सुविधा विकासाला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा आहे.



**'या' जिल्ह्यांना थेट फायदा**

हा महामार्ग महाराष्ट्रातील महत्त्वाच्या चार जिल्ह्यांमधून जाणार आहे. यामध्ये नाशिक, अहिल्यानगर (अहमदनगर), धाराशिव आणि सोलापूरचा समावेश आहे. या महामागार्मुळे राज्याच्या दळणवळणाला नवी गती मिळेल. विशेषतः शेतमाल आणि औद्योगिक उत्पादनांच्या वाहतुकीसाठी हा मार्ग 'गेम चेंजर' ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. नाशिक ते अक्कलकोट दरम्यानचा हा ग्रीनफिल्ड मार्ग वाढवण बंदर इंटरचेंजजवळ दिल्ली-मुंबई एक्स्प्रेस वेला, नाशिकमध्ये राष्ट्रीय महामार्ग -६० (आडेगाव) च्या जंक्शनवर आग्रा-मुंबई कॉरिडॉरला आणि पांगरी (नाशिक जवळ) येथे समृद्धी महामागार्ला जोडण्याचे प्रस्तावित आहे. हा प्रस्तावित मार्ग पश्चिम किनारपट्टीपासून पूर्व किनारपट्टीपर्यंत थेट दळणवळण उपलब्ध करेल. चेन्नई बंदराच्या बाजूने, तिरुवल्लूर, रेणिगुंटा, कडप्पा आणि कुर्नूलमार्गे चेन्नई ते हसापूरपर्यंत (महाराष्ट्र सीमा, ७०० कि.मी. लांब) चार पदरी मार्गिकेचे काम प्रगतीपथावर आहे. ह्यएनआयसीडीसीह्ने महाराष्ट्र राज्य शासनाद्वारे हाती घेतल्या जाणाऱ्या प्रस्तावित नवीन एक्स्प्रेस वेचा भाग म्हणून हा प्रकल्प असेल. या प्रकल्पामुळे सुधारित सुरक्षा आणि विनाव्यत्यय वाहतुकीसाठी द्रुतगती मार्ग उपलब्ध होणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ, वाहतूक कोंडी आणि परिचालन खर्च कमी व्हायला मदत होईल. महत्त्वाचे म्हणजे, हा प्रकल्प या क्षेत्रातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याबरोबरच नाशिक, अहिल्यानगर, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांच्या सर्वांगीण आर्थिक विकासात मोलाचे योगदान देईल. हा सहापदरी ॲक्सेस-कंट्रोल्ड ग्रीनफिल्ड कॉरिडॉर 'क्लोज टोलिंग' सुविधेसह असणार आहे. या मार्गावर सरासरी ताशी ६० कि.मी. आणि ताशी १०० कि.मी. डिझाइन स्पीडची अनुमती असेल. यामुळे प्रवासाचा एकूण वेळ अंदाजे १७ तासांपर्यंत कमी होईल. तसेच प्रवासी आणि मालवाहू वाहनांसाठी अधिक सुरक्षित, वेगवान आणि विनाव्यत्यय दळणवळणाची सुविधा उपलब्ध होईल. या प्रकल्पामुळे सुमारे २५१.०६ लाख मनुष्य-दिवस प्रत्यक्ष रोजगार आणि ३१३.८३ लाख मनुष्य-दिवसांचा अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होईल. या प्रस्तावित मार्गिकेच्या आसपासच्या परिसरात आर्थिक घडामोडी वाढल्यामुळे अतिरिक्त रोजगाराच्या संधी देखील निर्माण होतील.

**३१ तासांचा वेळ आता थेट १७ तासांवर**

सध्या नाशिक ते सोलापूर प्रवासासाठी लागणारा ३१ तासांचा वेळ (जड वाहतुकीसह) आता थेट १७ तासांवर येणार आहे. तसेच सध्याचे ४३२ किलोमीटरचे अंतर कमी होऊन ते ३७४ किलोमीटरवर येईल. हा महामार्ग केवळ शहरांनाच नाही, तर ८ रेल्वे स्थानके आणि ६ विमानतळांना जोडणारा एक महत्त्वाचा दुवा ठरणार आहे.

# नवी मुंबईतील मतदार करणार ३ ते ४ वेळा मतदान

## बहुसदस्यीय पद्धतीने प्रथमच निवडणूक... व्यापक जनजागृतीची गरज

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

नवी मुंबई महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून, ही निवडणूक पालिकेच्या इतिहासात प्रथमच बहुसदस्यीय पद्धतीने पार पडणार आहे. त्यामुळे मतदारांना मतदान प्रक्रियेबाबत योग्य माहिती असणे अत्यंत आवश्यक असल्याने व्यापक जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे. नवी मुंबई महापालिकाक्षेत्रात एकूण २८ प्रभाग असून, त्यापैकी प्रभाग क्रमांक १ ते २७ मध्ये प्रत्येकी चार सदस्य ('अ', 'ब', 'क', 'ड') निवडले जाणार आहेत. तर प्रभाग क्रमांक २८ मध्ये तीन सदस्य ('अ', 'ब', 'क') निवडले जाणार आहेत. त्यामुळे प्रभाग १ ते २७ मधील प्रत्येक मतदाराने चार वेळा मतदान करणे आवश्यक असून, प्रभाग २८ मधील मतदारांना तीन वेळा मतदान करावे लागणार आहे. प्रत्येक जागेसाठी स्वतंत्रपणे एक मत द्यायचे आहे. महत्त्वाचे म्हणजे एका जागेसाठी एकापेक्षा जास्त मते देता येणार नाहीत. प्रत्येक जागेतील उमेदवारासमोरील बटण दाबल्यानंतर संबंधित लाल दिवा पेटेल. चारही (किंवा तीन) जागांसाठी मतदान पूर्ण झाल्यानंतर 'बीप' असा आवाज येईल, म्हणजे मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्याचे समजावे.



**'एक जागा, एक मत' बंधनकारक**

- 'अ' जागेसाठी १ मत
- 'ब' जागेसाठी १ मत
- 'क' जागेसाठी १ मत
- आणि 'ड' जागेसाठी १ मत

**वेगवेगळ्या रंगांच्या मतपत्रिका**

- 'अ' जागेसाठी - पांढरा रंग
- 'ब' जागेसाठी - फिकट गुलाबी
- 'क' जागेसाठी - फिकट पिवळा
- 'ड' जागेसाठी - फिकट निळा

**'नोटा'चा पर्यायही उपलब्ध**

जर एखाद्या जागेसाठी कोणताही उमेदवार पसंत नसेल, तर त्या जागेच्या शेवटी 'नोटा' हा पर्याय उपलब्ध असणार आहे. तसेच प्रभाग १ ते २७ मधील मतदारांनी एकूण ४ मते, तर प्रभाग २८ मधील मतदारांनी एकूण ३ मते देऊन लोकशाहीने दिलेला मतदानाचा हक्क बजावावा.

# शिक्षक भरतीची जबाबदारी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे

## शिक्षण आयुक्त कार्यालयावरील ताण कमी करण्यासाठी निर्णय

■मुंबई। प्रतिनिधी,

पवित्र पोर्टलमार्फत होणाऱ्या शिक्षक पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. या निर्णयानुसार राज्यस्तरावरील शिक्षक पदभरतीशी संबंधित सर्व कामे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे सोपविण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. याबाबतचा शासन निर्णय शिक्षण विभागाने जाहीर केला आहे.

शिक्षण विभागाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी शिक्षण आयुक्त कार्यालयाची आहे. २०१७ पासून पवित्र पोर्टलद्वारे शिक्षक भरतीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.



तर महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही शालेय शिक्षण विभागांतर्गत कायद्याद्वारे स्थापित झालेली स्वायत्त संस्था आहे. या संस्थेमार्फत शिक्षक पात्रता परीक्षा, शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी यासारख्या परीक्षांचे आयोजन केले जाते. शिक्षक पदभरतीशी संबंधित परीक्षेचे आयोजन व निवड प्रक्रिया एकाच संस्थेकडे असणे आवश्यक असल्याने शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी २०२५ आणि त्यानंतरच्या सर्व शिक्षक भरती प्रक्रियेचे आयोजन व निवड प्रक्रिया सुकाणू समितीच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून पार पाडली जाणार आहे. याशिवाय, पवित्र पोर्टलवरील पदभरतीशी संबंधित कामकाजाचे कार्यालयनिहाय वाटप व जबाबदारी निश्चित करण्याचे अधिकारही सुकाणू समितीला देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे शिक्षक भरती प्रक्रिया अधिक सुसूत्र, पारदर्शक व कार्यक्षम होईल, तसेच शिक्षण आयुक्त कार्यालयाला इतर धोरणात्मक कामांवर अधिक लक्ष केंद्रित करता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती**

पवित्र पोर्टलमार्फत राज्यस्तरावरील शिक्षक पदभरतीशी संबंधित महत्त्वाचे तसेच अन्य धोरणात्मक निर्णय यांच्या अंमलबजावणीसाठी तसेच त्या अनुषंगाने आवश्यक ते निर्णय घेण्यासाठी, शासनास शिफारस करण्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्याचे शिक्षण आयुक्त हे या सुकाणू समितीचे अध्यक्ष असतील तसेच राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक, प्राथमिक शिक्षण संचालक माध्यमिक शिक्षण संचालक हे या समितीचे सदस्य असतील तर राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्त हे या समितीचे सदस्य सचिव असणार आहेत.

# माय-लेकीच्या पवित्र नात्यालाच धक्का

## मुलीला विकण्याचा प्रयत्न करणाऱ्या आईला शिक्षा

■मुंबई। प्रतिनिधी,

'आई जन्म देते, आपल्या पाल्यांचे संगोपन करते, त्यांचे पोषण करते आणि जगातील क्रूरतेपासून वाचवतेही. पण जेव्हा आईच आपल्या मुलीला त्या क्रूरतेकडे ढकलते, तेव्हा त्या पवित्र नात्याबद्दलच्या मुलीच्या विश्वासालाच तडा जातो,' असे निरीक्षण नोंदवत दिंडोशी सत्र न्यायालयाने एका आईला दहा वर्षांची शिक्षा नुकतीच ठोठावली.

स्वतःच्या मुलीला शरीरविक्रयात ढकलण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप या महिलेवर होता. ऑगस्ट-२०२१ मध्ये एका स्वयंसेवी संस्थेने केलेल्या स्टिंग ऑपरेशनमुळे हा प्रकार उघडकीस आला होता. पोलिसांनी नोंदवलेल्या एफआयआरनुसार, संस्थेने एका बनावट ग्राहकाला पाठवून त्या महिलेशी संपर्क साधला होता. त्यानंतर आरोपी महिलेने दोन मुली ६५ हजार रुपयांना पुरवण्याची तयारी दाखवली. तिने व्हॉट्सॲपवर मुलींची छायाचित्रेही पाठवली. त्यातील एक मुलगी तिची स्वतःचीच होती. ती १७ वर्षांची होती.

बनावट ग्राहकाने तिच्याशी चर्चा करून भेट निश्चित केली. त्याप्रमाणे संस्थेने पोलिसांत तक्रारही दिली होती. त्यानंतर पोलिसांनी खुणा केलेल्या पाच हजार रुपयांच्या नोटा ग्राहकाने आगाऊ रक्कम म्हणून महिलेच्या हाती दिल्या. त्याचवेळी सापळा रचून बसलेल्या पोलिसांनी छापा मारला आणि महिलेच्या ताब्यातून त्या नोटा जप्त केल्या. त्यानंतर पोलिसांनी आरोपी महिलेसह तीन महिलांविरोधात गुन्हा नोंदवून त्यांना अटक केली.

खटल्याच्या सुनावणीअंती आरोपी आई वगळता अन्य दोन महिलांविरोधात सबळ पुरावे नसल्याचे लक्षात घेऊन अतिरिक्त सत्र न्यायाधीश नीता अणेकर यांनी त्यांना निर्दोष ठरवले. मात्र आईविरोधात भादंवि, अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा आणि बालन्याय कायद्यातील संबंधित कलमांखालील आरोप सिद्ध झाल्याचा निष्कर्ष नोंदवून तिला दहा वर्षांची शिक्षा ठोठावली.

**'अशा आईला दया दाखवता येणार नाही'**

'आई व तिच्या मुलामुलींमधील नाते हे प्रेम व विश्वासाचे पवित्र नाते असते. जगात इतके मजबूत नाते दुसरे कोणतेच नाही. आईचे प्रेम हे सर्वात पवित्र, निःस्वार्थी व मजबूत असते. ती आई जन्म देण्याबरोबरच मुलांचे संगोपन करते, त्यांचे पोषण करते आणि जगातील क्रूरतेपासून त्यांचे रक्षणही करते. पण जेव्हा आईच स्वतःच्या मुलीला जगातील क्रूरतेकडे ढकलते, तेव्हा तिच्या जीवनावरील सर्व आशा-अपेक्षाच जणू संपुष्टात येतात. आपल्या मुलीला ला वेश्या व्यवसायासाठी नेऊन आणि फसवणूक करून आरोपी महिलेने प्रेम व विश्वासाच्या पवित्र नात्याचाच भंग केला आहे. त्यामुळे तिला कोणतीही दया दाखवता येणार नाही,' असे न्यायालयाने आपल्या निर्णयात नमूद केले.




# तक्रार करण्यास गेलेल्या तरुणास रेल्वे अधिकाऱ्यांनी ठेवले डांबून

■भाईंदर। प्रतिनिधी,

भाईंदर रेल्वे स्टेशनमध्ये मराठीची उद्घोषणा होत नसल्याने त्याचा जाब विचारण्यासाठी गेलेल्या एका मराठी तरुणास रेल्वे अधिकार्यांनी दोन तास डांबून ठेवल्याची तक्रार आहे. याप्रकरणी मराठी एकीकरण समितीने सदरील अधिकार्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. तक्रारीनुसार, भाईंदर रेल्वे स्थानकात तक्रार करण्यास गेलेल्या मराठी तरुणाला रेल्वे अधिकारी विपीन सिंग ने २-३ तास डांबून ठेवले. त्या तरुणाला सोडवायला तात्काळ मराठी एकीकरण समितीचे प्रमोद पार्टे, महेश पवार, प्रवीण भोसले, नाना खुणे यांच्यासह तात्काळ स्थानकावर गेले आणि त्याची सुटका केली. ३० डिसेंबर, रात्री ९ ते ११ भाईंदर रेल्वे स्थानकावर केवळ हिंदी व इंग्रजीतच आवाजी सूचना दिल्या जात होत्या. यावर स्थानिक नागरिक जिगर पाटील यांनी फक्त तक्रार वही मागितली असता, स्टेशन मास्टर विपीन सिंग यांनी अत्यंत अपमानास्पद व धमकीवजा शब्द वापरले मराठी नहीं है तो क्या करेगा, रेल्वे पोलिसांना बोलवा, तसेच थांब तुला दाखवतो अशी धमकी दिली. त्यानंतर पुन्हा दोन तास डांबून ठेवले होते,असा आरोप आहे.

तसेच ते रेल्वे प्रवासात नव्हते, दुचाकी पार्किंगमध्ये लावून फक्त तक्रार करण्यासाठी आले होते. स्थानकावर तक्रार करण्यास का आला, तिकीट काढून यायचे म्हणून नायगाव येथून टीसी बोलावून २६० रुपयांचा खोटा दंड लावण्यात आला. महाराष्ट्रात मराठी भाषेबाबत तक्रार करणे गुन्हा आहे का? लोकसेवकाला नागरिकांना धमकावण्याचा अधिकार आहे का? असा प्रश्न मराठी एकीकरण समितीने मुख्यमंत्र्यांना विचारला आहे.

# पतीचे ब्युटी पार्लर महिलेशी प्रेमसंबंधाचा संशय

## बायकोनं तिच्यावर ॲसिडने हल्ला करण्यास दिली सुपारी



**ॲसिड हल्ला केलेल्या व्यक्तीच्या घरी पोलिसांची धाड**

या घटनेनंतर, आरोपी नीतू देवी आणि सुमन ब्युटी पार्लरच्या मालकाला एका उपचारासाठी रुग्णालयात नेले होते. सोमवारी रात्री पोलिसांनी एहसानच्या घरी धाड टाकली होती. त्यात ॲसिडची बाटली आणि त्या ॲसिडमध्ये भिजवलेले कापड देखील जप्त करण्यात आले. नीतू देवी यांच्या घरातून पोलिसांनी 97 हजार रोख रक्कम जप्त केली, ही रक्कम तिने एहसानसाठी ठेवली होती, असं सांगण्यात येत आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

बिहारच्या पाटणातील मोकामा येथे एका महिलेला आपल्या पतीचे अनैतिक प्रेमसंबंध सुरु असल्याची भनक लागली होती. याच बदल्याची आग म्हणून तिने ब्युटी पार्लर चालवणाऱ्या महिलेवर ॲसिडने हल्ला करण्यासाठी एका व्यक्तीला सुपारी दिली. या प्रकरणात पोलिसांनी दोन महिलांसह ३ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. या प्रकरणातील मुख्य आरोपी महिलेचं नाव नीतू देवी असे आहे. ती मोकामा येथील डाकबंगला येथील रहिवासी आहे. तिचा पती कुंदन मिश्राचे ब्युटी पार्लरच्या मालकाशी अवैध संबंध असल्याचा संशय होता. तिने तिच्या मोलकरीन सुमन देवीसोबत मिळून ॲसिड हल्ल्याचा कट रचला होता. हा ॲसिड हल्ला मोहम्मद एहसानला करण्यास सांगितला होता, अशी माहिती समोर आली होती.

**गुन्ह्यात तिघांच्या पोलिसांनी आवळल्या मुसक्या**

या प्रकरणात पोलिसांनी सुमन आणि एहसान यांच्या मुसक्या आवळल्या आहेत. याच ॲसिड हल्ल्यात मदत करणाऱ्या मोहम्मद एहसानच्या साथीदाराची शोधमोहिम सुरु ठेवण्यात आली. मोहम्मद हा एहसान हा बारह येथील रहिवासी असल्याचं तपासातून समोर आलं होतं. तसेच आरोपींकडून रोख रक्कम, मोबाईल फोन आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली दुचाकी पोलिसांनी जप्त केली आहे.

**ॲसिड हल्ल्यासाठी एक लाख रुपये आणि...**

दरम्यान, बारहचे एसडीपीओ आनंद कुमार सिंह यांनी मंगळवारी सांगितलं की, 'आरोपी नीतू देवी हिला तिचा पती आणि पीडितेमध्ये काहीतरी प्रेमसंबंध सुरु असल्याचा संशय बळावला होता. तिने तिच्या मोलकरणीसोबत मिळून पीडितेवर ॲसिडने हल्ला करण्याचा कट रचला. नीतू आणि सुमन यांनी ब्युटी पार्लर महिलेवर ॲसिड फेकण्यासाठी मोहम्मद एहसानला एक लाख रुपये दिल्याचा आरोप आहे. रविवारी सायंकाळी दुचाकीवरून आलेल्या काही हल्लेखोरांनी मालकावर ॲसिड हल्ला केला आणि घटनास्थळावरून पळ काढला होता.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by Dr. Mr. Deepak Moreshwar Naik. Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com